दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ७ वे अंक –३४ सोमवार दि.१२ ऑक्टोबर २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-7th Issue- 34 Monday, Dt.12 October 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# दिल्लीत दुस-या दिवशीही आंदोलन

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

जंतरमंतर २.० मध्ये ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात आंदोलनाचे रणशिंग फुकण्यात आल्यानंतर काल पहिल्या दिवशी दिल्ली पोलिसांनी आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांच्या दडपशाहीला भीक न घालता सलग दुस-या दिवशी दिल्लीत अभूतपूर्व संघर्ष पाहायला मिळाला. आजही शेकडोंच्या संख्येने आंदोलकांना रस्त्यांवरून उचलून नेत छावण्यांमध्ये बंदिस्त केले. मात्र, आंदोलकांनी जिथे जागा मिळेल, तिथे जंतरमंतर समजून आंदोलन करण्याचा प्रयत्न केला.



सलग दुस-या दिवशी नेहा बोराने जंतरमंतरकडे कूच करण्याचा प्रयत्न केला. नेहाने कॅनॉट प्लेसपर्यंत धावत जात जंतरमंतरच्या ठिकाणी पोहोचण्याचा प्रयत्न केला. मात्र, रॅपिड अॅक्शन फोर्सच्या जवानांनी तिला ताब्यात घेत पुन्हा एकदा बसमध्ये बसवले. यानंतर नेहाने बसमधील व्हिडिओ शेअर केला. नेहाने बसलाच तुरुंग बनविल्याचे म्हटले. खिडक्यांना जाळ्या आहेत. बसमध्ये ४ लहान कोठड्या आहेत, ज्यांना कुलूप लावले आहे. श्वास घ्यायलाही जागा नाही. जाळीच्या दुस-या बाजूला काचा आहेत. सर्व पुरुष आंदोलकांना शिवीगाळ करण्यात आली. आई, बहीण, जात, धर्म जे काही सुचेल, त्यावरून शिवीगाळ केली. त्यांच्या गुप्तांगांवर लाथा मारल्या. आठ–सहा जणींना चार वेगवेगळ्या बसमध्ये कोंबले, असे नेहाने व्हीडीओत म्हटले.सीजेपी आंदोलन करणारच

आम्ही आंदोलन करणार नाही, अशा कोणत्याही बाँडवर आम्ही स्वाक्षरी केलेली नाही, त्यामुळे आम्ही पुन्हा एकदा आंदोलनात उतरणार आहोत, अशा शब्दात सीजेपी संस्थापक अभिजित दिपके यांनी भूमिका स्पष्ट केली. दुसरीकडे सीजेपीने ट्विट करून अभिजित दिपके यांच्या भूमिकेला दुजोरा दिला. दरम्यान, सीजेपीच्या पत्रकार परिषदेतही कोणत्याही परिस्थितीत आंदोलन थांबविणार नाही, असे म्हटले आहे.




## शेतीच्या कारणावरून चुलत भावावर प्राणघातक हल्ला

**हल्ल्यात जखमी झालेला चुलत भाऊ मरण पावला असे समजून हल्लेखोरांनी पळ काढला**

**वाघेबाभूळगाव येथील घटना ; चुलत भाऊ आणि भावजयी विरुद्ध गुन्हा दाखल**

केज/प्रतिनिधी

शेतीच्या कारणावरून सख्या चुलत भावास शेजाऱ्याच्या उसाच्या शेतात नेऊन नवरा बायकोने काठीने, लोखंडी गजाने मारहाण करीत जिवे मारण्याच्या उद्देशाने डोक्यात दगड घातला. चुलत भाऊ बेशुद्ध पडल्या नंतर तो मरण पावल्याचे समजून हल्लेखोरांनी त्या ठिकाणाहून काढता पाय घेतल्याची घटना केज तालुक्यातील वाघेबाभूळगाव येथे घडली.गंभीर जखमी असलेल्या शेतकऱ्या वर बीडच्या खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून ते बेशुद्धावस्थेत असल्याने त्याची परिस्थिती गंभीर आहे. या प्रकरणी हल्लेखोर चुलत भाऊ आणि भावजयी विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

बीड जिल्ह्यातील वाघेबाभूळगाव ता. केज येथे शेतकरी सोमनाथ भागवत घायाळ यांना मागील काही दिवसांपासून त्यांचा चुलत भाऊ योगेश शिवाजी घायाळ हा जमीनीच्या कमी–जास्त काकरी वरुन दमदाटी करीत तुला जीवे मारुन टाकील.अशी वारंवार धमकी देत आणि शिवीगाळ करत होता.

दि.५ ऑक्टोबर रोजी दुपारी २–३० वाजेपर्यंत सोमनाथ घायाळ यांनी त्यांची पत्नी निलावती व

पान २ वर...

## केज येथील भवानी माता मंदिरात घट स्थापना

**शारदीय नवरात्रौत्सवाला भक्तिभावात प्रारंभ**

केज ।प्रतिनिधी

केज शहरातील भवानी मातामंदिर येथे आश्विन शुद्ध प्रतिपदेच्या शुभ मुहूर्तावर पारंपरिक व धार्मिक विधीनुसार घटस्थापना करण्यात आली असून,यंदाच्या शारदीय नवरात्रौत्सवाला अत्यंत भक्तिमय आणि उत्साही वातावरणात सुरुवात झाली आहे. पुढील नऊ दिवस येथे अखंड दीपप्रज्वलन आणि विविध धार्मिक कार्यक्रमांनी आई जगदंबेचा जागर होणार आहे.



नवरात्रौत्सवाच्या पहिल्या दिवशी पहाटे महापूजा,अभिषेक व मंत्रोच्चाराच्या जय घोषात विधीवत घटस्थापना करण्यात आली.याप्रसंगी देवीच्या मूर्तीची आकर्षक व देखणी पूजा बांधण्यात आली असून,फुलांच्या माळा व रोषणाईने मंदिराचा गाभारा सजवण्यात आला आहे.पहाटे पासूनच भाविकांनी दर्शनासाठी मंदिरात मोठी गर्दी केली होती.

उत्सवाच्या नऊ दिवसांत मंदिरात दररोज सकाळी व संध्याकाळी महा आरती,दुर्गा सप्तशती पाठ,भजन,कीर्तन आणि देवीचा जागर अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती भवानी माता मंदिराचे पुजारी श्री.सुशीलकुमार टोपे यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

मंदिर परिसर भगव्या पताका आणि आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघाला आहे. परिसरातील भाविक मोठ्या श्रद्धेने दर्शनाचा लाभ घेत असून, नवरात्रौत्सवामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले आहे. तसेच बच्चे कंपनी व भाविक भक्तांना मौजमजा करण्यासाठी खेळाची रहाट पाळणा व इतर खेळाची साधने उपलब्ध आहेत.तसेच खवैय्या साठी विविध खाद्यपदार्थांची रेलचेल उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## लाडेवडगाव मध्ये पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न

**दलित वस्तीत स्वतंत्र डीपी व सिंगल फेज देण्याची मागणी,निकृष्ट व अपुऱ्या कामांमुळे जलजीवन ठरली कुचकामी; विहिरी आटल्याने ग्रामस्थांवर भटकंतीची वेळ, तातडीने प्रश्न न सुटल्यास उपोषणाचा इशारा बीड जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन**




केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील मौजे लाडेवडगाव येथे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस अत्यंत गंभीर बनला असून,ग्रामस्थांना पाण्यासाठी तीव्र भटकंती करावी लागत आहे.यंदा समाधानकारक पाऊस न झाल्यामुळे उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच गावात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून,गावातील पाणीटंचाई व दलित वस्तीतील विजेचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा अन्यथा उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागेल,असा इशारा ग्रामस्थांच्या वतीने राहुल गिणाजी शिंदे यांनी जिल्हा प्रशासनाला दिला आहे

जलजीवन व राष्ट्रीय पेयजल योजनेचा बोजवारा

गावामध्ये राष्ट्रीय पेयजल व जलजीवन अभियानांतर्गत सार्वजनिक विहिरी वरून पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करण्याचे नियोजन होते.मात्र,या योजनांची कामे निकृष्ट दर्जाची झाली असून ती अपूर्ण राहिली आहेत.त्यातच पाऊस कमी पडल्याने विहिरी आटत चालल्याने पाणी टंचाईची तीव्रता आणखी वाढली आहे.

पान २ वर...

## आडसच्या प्रसिद्ध आठवडे बाजारात उघड्यावर खाद्य पदार्थांची विक्री

**नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर!अन्न व औषध प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तपासणी करण्याची नागरिकांची मागणी**

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील आडस हे गाव प्राचीन आडकेश्वर महादेव मंदिर आणि दर शनिवारी भरणाऱ्या प्रसिद्ध आठवडे बाजारामुळे पंचक्रोशीत ओळखले जाते.या बाजारात खरेदीसाठी मोठ्या संख्येने नागरिकांची गर्दी होत असते.मात्र, बाजारात उघड्यावर विक्रीसाठी ठेवण्यात येणाऱ्या खाद्य पदार्थांच्या स्वच्छतेचा आणि सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर येण्याची शक्यता आहे.आठवडे बाजारात विविध खाद्यपदार्थ,चटपटीत पदार्थ,मिठाई तसेच इतर खाण्याच्या वस्तूंची विक्री केली जाते.यापैकी काही पदार्थ उघड्यावर ठेवल्यामुळे त्यावर धूळ,माती,धूर तसेच माशा बसण्याची शक्यता असते.अशा पदार्थांची योग्य स्वच्छता आणि



सुरक्षित साठवणूक नसेल,तर नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि संवेदनशील प्रकृतीच्या व्यक्तींनी अशा पदार्थांच्या स्वच्छते बाबत काळजी घेणे आवश्यक आहे.अन्न सुरक्षा नियमांची अंमल बजावणी गरजेची आहे

नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित हा महत्त्वाचा विषय लक्षात घेता,अन्न व औषध प्रशासनाने आडसच्या आठवडे

पान २ वर...

## माजलगाव जलाशयातून अवैध पाणी उपसा करणाऱ्यांवर संयुक्त पथकाची मोठी कारवाई

**३५० मोटारी व ५० सोलर पॅनेल हटवले**

बीड (जिमाका)

माजलगाव जलाशयातून मंगरूळ १ आणि मंगरूळ २ या ठिकाणी होत असलेल्या अवैध पाणी उपशाविरोधात १० ऑक्टोबर २०२६ रोजी प्रशासनाच्या संयुक्त पथकाकडून मोठी धडक कारवाई करण्यात आली. या मोहिमेत अवैध पाणी उपसा करणाऱ्या तीन वेगवेगळ्या ठिकाणांहून तब्बल ३५० पाण्याच्या मोटारी आणि ५० सोलर पॅनेल काढून टाकण्यात आले आहेत. प्रशासनाच्या या आक्रमक पावलामुळे अवैध पाणी उपसा करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

या कारवाई दरम्यान संबंधित शेतकरी आणि ग्रामस्थांना प्रशासनाकडून सक्त ताकीद देण्यात आली असून, त्यांच्याकडून यापुढे जलाशयातून कोणत्याही प्रकारचा अवैध पाणी उपसा करणार नसल्याचे लेखी आश्वासन लिहून घेण्यात आले आहे. पाण्याचे महत्व आणि धरणातील पाणीसाठा लक्षात घेता ही कारवाई केवळ एका दिवसापुरती मर्यादित राहणार नाही. भविष्यात पुन्हा



अवैध पाणी उपसा सुरू होऊ नये यासाठी यापुढेही अशीच सातत्याने कारवाई चालू राहील, असा स्पष्ट इशारा पाटबंधारे विभागाकडून देण्यात आला आहे.

ही व्यापक कारवाई माजलगाव धरण प्रशासन, पाटबंधारे विभाग, महसूल विभाग, पोलीस दल आणि विद्युत वितरण

पान २ वर...

## मंत्री रामदास आठवले यांची विराट सभा यशस्वी करा:अविनाश जोगदंड

बीड/प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची बीड शहरात शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठीक ४ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली खालील मागण्याची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी विराट जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

राज्यासह मराठवाड्यात व बीड जिल्ह्यात पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा पाण्याचा व मोल मजुरांच्या पोटापाण्याचा



प्रश्न गंभीर झाला आहे. पावसाअभावी राज्यभर दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळ जन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १ लाख रुपये मदत देण्यात यावी. शेतमजूर, कामगार व मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कुटुंबियांना ५० हजार रुपये मदत जाहीर करण्यात यावी. अनु जातीमधील ५९ जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया रद्द करण्यात यावी. कसत असलेल्या २०११ पर्यंतच्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. महागाई निर्देशांकानुसार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यात यावी.आदी मागण्याची पूर्तता करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरात दि. १६ ऑक्टोबर २०२६ शुक्रवार रोजी होणाऱ्या

विराट जाहीर सभेस बीड शहरातील रिपाइं पदाधिकारी, महिला गायरान धारक, विद्यार्थी, शेतमजूर यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे

पान २ वर...

## बीड शहरातील नगर नाका परिसरात शिवाजीनगर पोलिसांची धडक कारवाई

**विनापरवाना अवैध विदेशी दारू आणि वाहनासह १,११,२००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त**

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील अवैध दारु व्यवसायाला आळा घालण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत साहेब यांनी पोलीस अधिकारी व अंमलदारांना अवैध जुगार अड्ड्यांवर धाडी टाकून प्रभावी कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या सूचनांच्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख साहेब व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राजीव नवले साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस



निरीक्षक श्री. शितल कुमार बल्लाळ यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अधिकारी व अंमलदारांनी नगर नाका परिसरातील मेडोस स्पाच्या बाजूच्या गल्लीत सापळा रचून बेकायदेशीर विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्या एका इसमाला रंगेहात पकडले आहे.

दिनांक ०९/१०/२०२६ रोजी रात्री २२:०० वाजेच्या सुमारास शिवाजीनगर पोलिसांचे पथक नगर नाका परिसरात गस्त घालत असताना, एका गुप्त बातमीदाराद्वारे माहिती मिळाली की एक

पान २ वर...

संपादकीय....

# बीड जिल्हा दुष्काळाच्या विळख्यात.!

पाऊस रूसला, काळ्या आईची तहान वाढली.

घाम गाळणाऱ्या बळीराजाच्या डोळ्यांत चिंतेची सावली दाटली!

दुष्काळ : निसर्गाचे संकट की व्यवस्थेची परीक्षा.?

महाराष्ट्राच्या मराठवाड्यातील बीड जिल्हा वारंवार दुष्काळ, पाणीटंचाई आणि शेतीसमोरील संकटांमुळे चर्चेत येतो. जिल्ह्यातील बहुतांश ग्रामीण अर्थव्यवस्था शेती व पशुपालनावर अवलंबून आहे. त्यामुळे पावसाने दडी मारली की केवळ पिके करपतात असे नाही, तर शेतकऱ्यांची स्वप्ने, कुटुंबांचे अर्थकारण आणि ग्रामीण जीवनमानही कोलमडते.

पाणी नाही तर पीक नाही, पीक नाही तर उत्पन्न नाही; आणि उत्पन्न नाही तर जगण्याचा आधार नाही! ही आज अनेक शेतकरी कुटुंबांच्या संघर्षाची वस्तुस्थिती आहे.

आकडेवारी सांगते बीडची भौगोलिक व्यथा

महाराष्ट्र शासनाच्या भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या (ऋडऊ-) उपलब्ध माहितीनुसार, बीड जिल्ह्याचे क्षेत्रफळ सुमारे १०,६३८.५५ चौरस किलोमीटर असून, सर्वसाधारण वार्षिक सरासरी पर्जन्यमान ६६६.३६ मिलिमीटर आहे. जिल्ह्याच्या भूगर्भातील सुमारे ९९ टक्के भाग कठीण बेसॉल्ट खडकांनी बनलेला आहे. या खडकांमधील मर्यादित पाणी धारण क्षमता आणि पावसाच्या अनिश्चित वितरणामुळे भूजल पुनर्भरणाचे आव्हान निर्माण होते.

उपलब्ध २०२३-२४ भूजल मूल्यमापनात जिल्ह्यातील ४८ पाणलोट क्षेत्रांपैकी ४० सुरक्षित, तर आठ अंशतः उपशित म्हणून वर्गीकृत करण्यात आली होती.मात्र, ही आकडेवारी संबंधित मूल्यमापन कालावधीची आहे. ती २०२६ मधील प्रत्यक्ष पर्जन्यमान किंवा सध्याच्या दुष्काळाची तीव्रता दर्शवत नाही. त्यासाठी भारतीय हवामानशास्त्र विभाग आणि जिल्हा प्रशासनाची अद्ययावत आकडेवारी आवश्यक आहे.

शेतकरी आत्महत्या : संकटाची सर्वाधिक वेदनादायी बाजू

दुष्काळाची सर्वाधिक भीषण किंमत शेतकरी कुटुंबांना मोजावी लागते. पेरणीसाठी घेतलेले कर्ज, बियाणे-खतांचा वाढता खर्च, पावसाचा खंड, पीकनुकसान, उत्पादनाला मिळणारा अपुरा भाव आणि कर्जफेडीचा ताण यामुळे काही शेतकरी गंभीर मानसिक व आर्थिक संकटात सापडतात.शेतकरी आत्महत्या ही केवळ एका व्यक्तीची शोकांतिका नसते; तिचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर होतो. मुलांचे शिक्षण, कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि भविष्यातील सुरक्षितता यांवर त्याचे दूरगामी परिणाम होतात.मात्र, प्रत्येक आत्महत्येमागे केवळ दुष्काळच कारणीभूत असतो असे म्हणणे योग्य नाही. कर्जबाजारीपणा, बाजारातील अनिश्चितता, सामाजिक परिस्थिती आणि मानसिक ताण यांसह अनेक घटकांचा विचार करावा लागतो.

बीड जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्यांची अचूक संख्या मांडण्यासाठी वर्षनिहाय जिल्हा प्रशासनाची अधिकृत आकडेवारी आवश्यक आहे. पडताळणीविना संख्या देणे म्हणजे या गंभीर प्रश्नाचे चुकीचे चित्र उभे करणे होय.ज्याच्या घामातून उगवते सोन्यासारखी धान्याची रास, त्याच बळीराजाच्या आयुष्यात का निर्माण होतो निराशेचा आभास.?शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे केवळ मदतीच्या आकड्यांतून न पाहता, त्यांच्या उत्पन्नाची सुरक्षितता, कर्जाचा ताण, पीकविमा, बाजारभाव आणि मानसिक आरोग्य या सर्व बाबींकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

शेती, पशुधन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेची होरपळ..

सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, बाजरी आणि इतर पिकांसाठी पावसाचे वेळेवर पडणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पेरणीनंतर पावसाचा दीर्घ खंड पडल्यास पिकांची वाढ खुंटते. फुलोरा किंवा दाणे भरण्याच्या अवस्थेत पाण्याची कमतरता निर्माण झाल्यास उत्पादन घटण्याचा धोका वाढतो. दुष्काळात तेरावा महिना या म्हणीप्रमाणे शेतकऱ्यांवर एकामागून एक संकटे कोसळतात. उत्पादन घटते, खर्च वाढतो, शेतीमालाला अपेक्षित भाव मिळेलच याची खात्री नसते आणि कर्जफेडीची चिंता वाढते.

याचा परिणाम शेतमजूर, व्यापारी, वाहतूकदार आणि ग्रामीण लघुउद्योगांवरही होतो. रोजगाराच्या संधी कमी झाल्यास काही कुटुंबांना स्थलांतर करावे लागू शकते.पशुधनासाठी हिरवा चारा आणि पाणी उपलब्ध नसल्यास पशुपालकांची आर्थिक कोंडी अधिक गंभीर होते. त्यामुळे परिस्थितीनुसार चारा डेपो, पाणीपुरवठा आणि पशुधन संरक्षणाच्या उपाययोजना राबविणे आवश्यक ठरते.

उपाययोजना : तात्पुरत्या मदतीसोबत कायमस्वरूपी नियोजन

दुष्काळ निवारणासाठी केवळ टँकर आणि तात्पुरती आर्थिक मदत पुरेशी नाही. दीर्घकालीन जलसुरक्षेसाठी पुढील उपाय आवश्यक आहेत.जलसंधारण : नाला उपचार, शेतबांधबंदिस्ती, गाळ काढणे आणि पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याची कामे तांत्रिक निकषांनुसार करावीत.

शेतकऱ्यांना दिलासा : पात्र शेतकऱ्यांना पीकनुकसान मदत, पीकविमा आणि इतर योजनांचे लाभ वेळेत मिळतील याची दक्षता घ्यावी.पाण्याचे नियोजन : गावनिहाय जलअर्थसंकल्प तयार करून उपलब्ध पाणी, भूजल पुनर्भरण आणि पाण्याची गरज यांचा समतोल साधावा.शाश्वत शेती : स्थानिक परिस्थितीनुसार कमी पाण्यात येणारी पिके, पीक फेरपालट आणि ठिबक सिंचनाला प्रोत्साहन द्यावे.पशुधन संरक्षण : चारा उपलब्धता, पिण्याचे पाणी आणि आवश्यक पशुवैद्यकीय सुविधा यांचे नियोजन करावे.शेतकरी आत्महत्या प्रतिबंध : आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना समुपदेशन, मानसिक आरोग्यसेवा, कर्जविषयक मार्गदर्शन आणि शासकीय मदतीपर्यंत पोहोच उपलब्ध करून द्यावी.

पारदर्शक प्रशासन : पर्जन्यमान, पीकनुकसान, भूजलस्थिती, मदतवाटप आणि आत्महत्यांची अधिकृत आकडेवारी नियमितपणे सार्वजनिक करावी.जलसंधारणाची कामे केवळ कागदावर पूर्ण न होता त्यातून प्रत्यक्ष किती पाणी साठले, भूजल किती वाढले आणि शेतकऱ्यांना किती फायदा झाला, याचेही मूल्यमापन झाले पाहिजे.

बळीराजाला आश्वासन नव्हे, आधार हवा..!

संत तुकाराम महाराजांनी शेती आणि कष्टाचे महत्त्व आपल्या अभंगांतून अधोरेखित केले. शेती हा केवळ व्यवसाय नसून समाजाच्या अन्नसुरक्षेचा पाया आहे. म्हणूनच शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सहानुभूतीने नव्हे, तर ठोस धोरणे आणि कृतीतून पाहणे गरजेचे आहे.दुष्काळ हा निसर्गाचा प्रकोप असला, तरी त्याच्या परिणामांची तीव्रता कमी करणे मानवी नियोजनावर अवलंबून आहे. पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन, पाण्याचा काटकसरीने वापर, शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षितता आणि संकटग्रस्त कुटुंबांना वेळेवर मदत हेच दुष्काळमुक्त बीडच्या दिशेने महत्त्वाचे टप्पे आहेत.थेंब थेंब साचता तळे साचे या म्हणीप्रमाणे प्रत्येक गावाने जलसंधारणाचा संकल्प केला, प्रशासनाने जबाबदारीने काम केले आणि समाजाने बळीराजाच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले, तर दुष्काळाच्या संकटाची तीव्रता निश्चितच कमी करता येईल.बळीराजा जगला, तर गाव जगेल;

गाव समृद्ध झाले, तर महाराष्ट्र फुलेल..!

आज गरज आहे ती केवळ दुष्काळ जाहीर करण्याची नाही, तर दुष्काळाशी लढणाऱ्या शेतकऱ्याला जगण्याचा विश्वास देण्याची..!

पान १ वरून..

**लाडेवडगाव मध्ये....**

यापूर्वी पाण्याच्या विदारक परिस्थितीमुळे लहान निष्पाप बालकांना आपला जीव गमवावा लागल्याची धक्कादायक बाबही निवेदनात नमूद करण्यात आली आहे. उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच ही स्थिती असल्याने भर उन्हाळ्यात काय होणार,अशी भीती ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.

दलित वस्तीत वीज आणि पाण्याची दुहेरी अडचण

लाडेवडगाव येथील दलित वस्तीमध्ये स्वतंत्र विद्युत जनित्र (डीपी) नसल्यामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होतो.त्यामुळे दलित वस्तीत कायम स्वरूपी स्वतंत्र डीपी व सिंगल फेजची सोय करावी आणि नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी लावून धरण्यात आली आहे.

प्रशासकीय पातळीवर पत्र व्यवहार

यासंदर्भात गट विकास अधिकारी पंचायत समिती केज यांनी ग्रामपंचायतीला तातडीने पाणीटंचाई निवारण व डीपीबाबत कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते तसेच मंडळ अधिकारी होळ यांनीही प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, दलित वस्तीत नियमित पाणीपुरवठा होत नसल्याचे व महिला, नागरिकांना गावा बाहेरील विहिरींवरून पाणी आणावे लागत असल्याचे स्पष्ट झाले. या पाहणीचा अहवाल तहसीलदारांना सादर करण्यात आला आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत हे प्रकरण महावितरण च्या अधीक्षक अभियंत्यां कडेही पाठविण्यात आले आहे.वारंवार शासकीय पत्रव्यवहार होऊनही प्रत्यक्ष उपाययोजना होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.प्रशासनाने मूलभूत गरजांची दखल घेऊन तात्काळ पाणीपुरवठा सुरळीत करावा आणि स्वतंत्र डीपीची व्यवस्था करावी,अशी मागणी राहुल शिंदे व ग्रामस्थांनी केली आहे.

**शेतीच्या कारणावरून....**

लहान मुलगा शौर्य यांच्या सोबत शेतातील सोयाबीन काढल्या नंतर ते गावातून येतो असे सांगून निघून गेले. त्यानंतर त्यांचा चुलत भाऊ योगेश घायाळ आणि त्याची पत्नी वंदना योगेश घायाळ या दोघांनी सोमनाथ घायाळ याला एकट्याला गाठून त्याला विशाल हावळे यांचे ऊसाच्या शेतात नेले.त्या ठिकाणी शेतीच्या कारणावरून दोघा नवरा बायकोने त्यांना काठी,लोखंडी गजाने बेदम मारहाण केली.तर जीवे मारण्याच्या उद्देशाने डोक्यात धारदार दगड मारला.यात गंभीर जखमी झालेले सोमनाथ घायाळ हे बेशुद्ध पडले.ते मरण पावल्याचे समजून योगेश घायाळ व त्याची पत्नी वंदना घायाळ हे तेथून निघून गेले.दरम्यान,सोमनाथ घायाळ यांची पत्नी निलावती व आई मंडूबाई या दोघी स्वयंपाक करून रात्री ९-०० वाजेपर्यंत त्यांची घरी येण्याची वाट पाहत बसल्या असता त्यांना सोमनाथ घायाळ हे जखमी व बेशुद्धअवस्थेत विशाल हावळे यांच्या उसाच्या शेतात पडल्याचे त्यांना समजले.त्यांनी घटनास्थळी धाव घेतली असता सोमनाथ घायाळ यांच्या डोक्यातून, नाकातून,कानातून रक्त येऊन ते रक्ताच्या थारोळ्यात बेशुध्द पडलेले होते.त्यांना इतरांच्या मदतीने नेकनूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले.तेथे प्रथमोपचार करून पुढे बीडच्या जीवन ज्योत हॉस्पीटल येथे भरती केले आहे.

सोमनाथ घायाळ त्यांच्या मेंदूला गंभीर दुखापत होऊन मेंदूवर सुज आली असल्याने ते बेशुद्धावस्थेत असून त्यांचे परिस्थिती गंभीर आहे.त्यांच्या पाठीवर लोखंडी गजाने व काठीने मारहाण केल्याचे व्रण उमटलेले आहेत.१० ऑक्टोबर रोजी त्यांची पत्नी निलावती घायाळ यांनी दिलेल्या फिर्यादी वरून योगेश घायाळ, वंदना घायाळ या दोघा विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गु र नं ६४२/ २०२६ भा न्या सं १०९(१),३५१(२), ३५२,३(५) नुसार गुन्हा दाखल झाला आहे.पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम हे पुढील तपास करीत आहेत.

**माजलगाव जलाशयातून ....**

विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आली. या धडक मोहिमेत पाटबंधारे विभागाचे उपअभियंता शितल माने, एस. एस. शेख, मधुकर जाधव, महसूल विभागाचे मंडळ अधिकारी हंगे, पोलीस पाटील अल्ताफ शेख, पोलीस दलाचे उपनिरीक्षक (पीएसआय), विद्युत वितरण विभागाचे एस. बी. चव्हाण यांच्यासह ग्रामसेवक तसेच सर्व संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने आणि सक्रियपणे सहभागी झाले होते.

**आडसच्या प्रसिद्ध...**

बाजारात प्रत्यक्ष पाहणी करून खाद्यपदार्थ विक्रेत्यांच्या स्वच्छतेची आणि अन्नसुरक्षा नियमांच्या पालनाची तपासणी करावी,अशी मागणी पुढे येत आहे. खाद्यपदार्थ झाकून ठेवणे,स्वच्छ पाणी वापरणे,परिसर स्वच्छ ठेवणे आणि सुरक्षित पद्धतीने अन्नपदार्थांची हाताळणी करणे याबाबत विक्रेत्यांना आवश्यक सूचना देण्याची गरज आहे.

आठवडे बाजार ही ग्रामीण भागातील नागरिकांसाठी महत्त्वाची बाजारपेठ आहे.त्यामुळे विक्रेत्यांच्या व्यवसायावर परिणाम न करता,नियमांचे पालन सुनिश्चित करून नागरिकांना सुरक्षित खाद्यपदार्थ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.संबंधित प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन नियमित तपासणी करावी आणि नियमांचे उल्लंघन आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी,अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

नागरिकांचे आरोग्य महत्त्वाचे की उघड्या वर खाद्यपदार्थांची विक्री? हा प्रश्न उपस्थित होत असून, आडसच्या प्रसिद्ध आठवडे बाजारात स्वच्छता आणि अन्नसुरक्षेला प्राधान्य देण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलण्याची गरज आहे.

**बीड शहरातील नगर...**

इसम दुचाकीवरून विदेशी दारू विक्रीसाठी घेऊन जात आहे. या बातमीच्या आधारे पोलिसांनी दोन पंचांना सोबत घेऊन मेडोस स्पाच्या गल्लीत सापळा रचला. काही वेळातच संशयित इसम त्याच्या बजाज कंपनीच्या दुचाकीवरून (क्रमांक चक २३ इऋ ०६५३) पांढऱ्या रंगाच्या पिशवीत मुद्देमाल घेऊन जात असताना दिसला. पोलिसांनी त्याला थांबवून चौकशी केली असता त्याने आपले नाव महिपाल नारायणा कोमिडी (वय ४८ वर्षे, रा. ईसान नगर, ता. डोमाकोंडा, जि. निजामाबादः ह.मु. आदर्श नगर रोड, बीड) असे सांगितले.

जप्त केलेला मुद्देमालः

पंचांसमक्ष घेतलेल्या पाहणीत खालीलप्रमाणे मुद्देमाल हस्तगत करण्यात आलाः १) रॉयल स्टॅग कंपनीच्या विदेशी दारूच्या ९६ काचेच्या बाटल्या (१८० मिली, किंमत रु. २४,०००/-) २) क्लासिक गोल्ड व्हिस्कीच्या ४८ प्लास्टिक बॉटल्स (१८० मिली, किंमत रु. ७,२००/-) ३) बजाज कंपनीची दुचाकी (क्रमांक चक२३ इऋ०६५३, अंदाजे किंमत रु.८०,०००/-) एकूण जप्त मुद्देमाल किंमत: रु.१,११,२००/- (एक लाख अकरा हजार दोनशे रुपये) कायदेशीर कारवाई:

सदर इसमाविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस सुरु आहे. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत साहेब मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख साहेब तसेच मा. पोलीस उपअधीक्षक श्री. नवले साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. शीतलकुमार बल्लाळ साहेब, पोलीस स्टेशन शिवाजीनगर, बीड यांच्या नेतृत्वात पोलीस उप निरीक्षक माधव काटकर, पोह/२५६ मच्छिंद्र राख, पोशि/६६५ सचिन आगलावे, पोशि/९०४ लिंबा महानोर व पोशि/१३८५ राजेभाऊ जाधव यांनी केली.

**मंत्री रामदास आठवले ...**

आवाहन रिपाइं शहर अध्यक्ष अविनाश जोगदंड, संभाजी गायकवाड, विलास जोगदंड, प्रभाकर चांदणे, अड सुरेश वडमारे, नागेश (आण्णा) दुबळे, दिलीप खंदारे, भैय्यासाहेब मस्के, शाम वीर,भैय्या साळवे, महेंद्र वडमारे, दयानंद उजगरे, अक्षय कोकाटे, मनोज बोराडे, सचिन वडमारे, धम्मा पारवेकर, पप्पू वडमारे, के.के. कांबळे, आप्पा मिसळे, गौतम कांबळे, जितू धन्वे, संजय हनवते सोनू वडमारे, दिपक कांबळे, गणेश वाघमारे, अजिंक्य वडमारे आदिनी केले आहे.



## टिपर-पिकअप च्या भीषण धडकेत अंबाजोगाईतील दोन सख्ख्या भावांसह तिघांचा मृत्यू ; पाच जनावरांचाही बळी

केज/प्रतिनिधी

अहिल्यानगर- अहमदपूर राष्ट्रीय महामार्गावर केज शहरातील रेणू पेट्रोल पंपाजवळ टिपर आणि पिकअप वाहनांची जोरदार धडक होऊन भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत अंबाजोगाई येथील दोन सख्ख्या भावांसह तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला,तर टिपर चालक गंभीर जखमी झाला आहे.या अपघातात पिकअपमधील पाच जनावरांचाही मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

दोन सख्ख्या भावांचा जागीच मृत्यू

मिळालेल्या माहिती नुसार,अंबाजोगाई शहरातील बाराभाई गल्ली येथे राहणारे हनीफ शौकत कुरेशी वय २२ आणि आरिफ शौकत कुरेशी वय २० हे दोघे सख्खे भाऊ पिकअप वाहनातून जनावरे घेऊन जात होते.दरम्यान त्यांच्या पिकअप वाहनाला टिपरने जोरदार धडक दिल्याचे सांगण्यात येत आहे.ही धडक इतकी भीषण होती की,दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.या अपघातात हनीफ आणि आरिफ या दोन्ही भावांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्यासोबत असलेल्या आणखी एका व्यक्तीचाही या दुर्घटनेत मृत्यू झाला आहे.त्या व्यक्तीची ओळख अद्याप स्पष्ट झालेली नाही.

याअपघातात पिकअप मधील दोन गायी आणि तीन बैलांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे.टिपर चालक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे समजते.

## मगच धुराडे पेटवा ; १३ ऑक्टोबरला धनेगाव फाट्यावर बेमुदत चक्काजामचा इशारा



## मांजरा पट्ट्यातील ऊस उत्पादकांची एकजूट,आधी ऊसदर जाहीर करा

केज/प्रतिनिधी

गतवर्षीची थकीत ऊस बिले चुकती करावीत, चालू हंगामाचा दर जाहीर केल्याशिवाय कारखाने सुरू करू नयेत आणि दुष्काळी परिस्थितीत शासनाने प्रतिटन ५०० रुपये अनुदान द्यावे,या मागण्यांसाठी मांजरा पट्ट्यातील ऊस उत्पादक शेतकरी एकवटले आहेत. मागण्यांवर लेखी आश्वासन न मिळाल्यास मंगळवारी दि.१३ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता अंबाजोगाई-कळंब महामार्गावरील धनेगाव फाटा येथे बेमुदत चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे.केज तालुक्यातील धनेगाव कॅम्प येथे रविवार दि. ११ ऑक्टोबर रोजी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे आणि संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राहुल खोडसे यांच्या पुढाकारातून झालेल्या बैठकीला मांजरा पट्ट्यातील २५ गावां तील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची बैठक संपन्न संपन्न झाली.

या बैठकीत सतीश भाऊ शिंदे,केशव नाना ढगे,अरविंद मोरे, दिलीप लोंढे,अण्णा गायकवाड,विश्वास शिनगारे,डॉ.उत्तम खोडसे,बाळासाहेब गुजर,बाळासाहेब मोरे आदी शेतकरी प्रतिनिधी,शेकडो शेतकरी उपस्थित होते. गतवर्षीच्या घोषित दरानुसार थकीत रक्कम द्यावी,चालू हंगामासाठी प्रतिटन ४,२५० रुपये पहिली उचल आणि ५,००० रुपये अंतिम दर जाहीर करावा,अशी मागणी यावेळी करण्यात आली.ऊसदराच्या प्रश्नावर यापुढे एकजुटीने लढा देण्याचा निर्धारही शेतकऱ्यांनी व्यक्त केला.यंदा पावसाचा दीर्घ खंड पडल्याने उसाची वाढ खुंटली आहे.मांजरा धरणाचे पाणी पिण्यासाठी राखीव ठेवल्याने सिंचनासाठी पाणी उपलब्ध होण्यात अडचणी येत आहेत. त्यातच खते,औषधे, इंधन आणि मशागतीचा खर्च वाढल्याने उत्पादन घटण्याची भीती आहे. या पार्श्वभूमीवर अंबासाखर,नॅचरल शुगर,येडेश्वरी आणि गंगामाऊली या कारखान्यांनी थकीत बिले चुकती करून यंदाचा ऊसदर जाहीर करावा,अशी मागणी करण्यात आली.तसेच शासनाने ऊस उत्पादकांना प्रतिटन ५०० रुपये अनुदान द्यावे,अशी मागणीही शेतकऱ्यांनी केली.

संघर्ष टाळायचा असेल तर कारखानदारांनी तातडीने योग्य भूमिका घ्यावी.ऊसदर आणि थकीत बिलांबाबत लेखी आश्वासन देऊन प्रश्न मार्गी लावावा, असे आवाहन कुलदीप करपे यांनी केले. मागण्यांवर तोडगा न निघाल्यास दि.१३ ऑक्टोबर पासून बेमुदत चक्काजाम आंदोलन करण्याचा इशारा बैठकीत देण्यात आला.

# राज्यातील १२५ आरोग्य संस्थांचे आरोग्य संवाद यात्रे दरम्यान लोकार्पन

### नागपूर, ठाणे, पालघर, छ. संभाजीनगर, पुणे, सातारा,अमरावती,नाशिक,आणि कोकणातील आरोग्यसेवेला बळकटी

मुंबई ।प्रतिनिधी

१ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर पर्यंत होणाऱ्या आरोग्य संवाद यात्रे दरम्यान राज्यातील सुमारे १२५ आरोग्य संस्थांचे लोकार्पण करण्यात येणार आहे. आरोग्य विभागाचे वतीने १५ ऑगस्ट २६ रोजी राज्यातील पहिल्या टप्प्यातील १२४ आरोग्य संस्थांचे लोकार्पण करण्यात आले होते. आरोग्याच्या पायाभूत सुविधा बळकट करून, महाराष्ट्राला आरोग्य संपन्न बनवण्याच्या दिशेने दुसऱ्या टप्प्यातील आरोग्य संस्थांचे लोकार्पण महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

राज्यातील नागरिकांना त्यांच्या गावाजवळ, घराजवळ उत्तम दर्जेदार व तातडीच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देत आरोग्य सपन्न महाराष्ट्र' घडवण्याच्या प्रक्रियेत हा दुसरा टप्पा महत्त्वाचा मानला जात असुन, आगामी काळात राज्यातील तिसऱ्या टप्प्यातील आणखी २५० आरोग्य संस्था नागरिकांच्या सेवेत रुजू करण्याचा दृष्टीने युद्धपातळीवर कार्यवाही सुरू करण्याच्या सूचना आरोग्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री नामदार प्रकाश आबिटकर यांचे अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व आरोग्य संस्थांची बांधकामे, मनुष्यबळ, वैद्यकीय उपकरणे, फर्निचर, विज,पाणी




जोडणी व इतर आवश्यक पायाभूत सुविधाबाबत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आढावा घेतला. सार्वजनिक आरोग्य विभागाचे आयुक्त श्री.संजय काटकर, वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बापू पवार, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड, सार्वजनिक बांधकाम (झथऊ)विभागाचे कार्यकारी अभियंता, पायाभूत सुविधा (खऊथ) कक्षाचे कार्यकारी अभियंता, संबंधित विभागांचे उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सर्व परिमंडळातील उपसंचालक, राज्यातील सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक तसेच संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणाली द्वारे या बैठकीला उपस्थित होते.

आरोग्य संस्थांचे बांधकाम पूर्णत्वास येत असतानाच आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या विभागाच्या निर्णयामुळे अल्प काळात दुसऱ्या टप्प्यातील नागपूर, अमरावती, संभाजीनगर, नाशिक,पुणे, ठाणे,पालघर, सातारा व कोकण विभागातील १२५ आरोग्य सुविधा नागरिकांच्या सेवेसाठी सज्ज होत आहेत. यामध्ये उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालय, प्रशिक्षण संस्था अशा विविध आरोग्य संस्थाचा समावेश आहे.यामुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना उपचारांसाठी मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागणार नाही. अपघातग्रस्त, माता-बालक, ज्येष्ठ नागरिक, तसेच आपत्कालीन रुग्णांना स्थानिक स्तरावरच अधिक गुणवत्तापूर्ण आणि वेळेवर उपचार मिळणार आहेत. याचबरोबर आरोग्य कर्मचाऱ्यांनाही अधिक सुसज्ज कार्यपरिसर उपलब्ध होणार आहे.याबाबत सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस , उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने आरोग्य सेवा सर्वसामान्यांच्या दारापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प केला आहे. सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा हे राज्य शासनाचे उद्दिष्ट अधिक प्रभावीपणे साकार

## केंद्रीयमंत्री रामदास आठवलेंच्या सभेला हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा :संभाजी गायकवाड

बीड ।प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची बीड शहरात शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठीक ४ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली खालील मागण्याची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी विराट जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.



राज्यासह मराठवाड्यात व बीड जिल्ह्यात पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा पाण्याचा व मोल मजुरांच्या पोटापाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पावसाअभावी राज्यभर दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळ जन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १ लाख रुपये मदत देण्यात यावी. शेतमजूर, कामगार व मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कुटुंबियांना ५० हजार रुपये मदत जाहीर करण्यात यावी. अनु जातीमधील ५९ जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया रद्द करण्यात यावी. कसत असलेल्या २०११ पर्यंतच्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. महागाई निर्देशांकानुसार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यात यावी.आदी मागण्याची पूर्तता करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरात दि. १६ ऑक्टोबर २०२६ शुक्रवार रोजी होणाऱ्या

विराट जाहीर सभेस बीड जिल्ह्यातील रिपाइं पदाधिकारी, महिला गायरान धारक, विद्यार्थी, शेतमजूर यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन रिपाइं भटके विमुक्त आघाडी जिल्हाध्यक्ष संभाजी गायकवाड, अविनाश जोगदंड, विलास जोगदंड, प्रभाकर चांदणे, नागेश आण्णा दुबळे, अक्षय कोकाटे, के. के. कांबळे, रतन वाघमारे, पप्पू वाघमारे, सन्नी जोगदंड, अमोल मिटकर, लखन जाधव, विजय डोळस, अभिषेक जोजारे, रोहित गायकवाड, करण वाघमारे, अशोक भाले, राम पवार, तुषार गायकवाड, साईनाथ जाधव, रोहित डोंगरे, कृष्णा वैष्णव, आकाश वाघमारे, आरशान शेख, विशाल माने, रितेश गुजाळ ओमकार गायकवाड, ए. एच. गायकवाड, परसराम जाधव, महेश काळे आदिनी केले आहे.

# दिल्लीच्या रस्त्यांवर जे घडले ते इतिहासात कोरले जाईल

## जंतर-मंतरकडे कूच रोखली! विमानतळापासून रस्त्यांपर्यंत पोलिसांची कडक कारवाई; सीजेपीचे नेते ताब्यात!






नवी दिल्ली : कॉकरोच जनता पार्टीच्या (सीजेपी) प्रस्तावित आंदोलनापूर्वी दिल्लीमध्ये कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली. मतदार यादीतील कथित अनियमितता आणि विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेचा निषेध करण्यासाठी तसेच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी पक्षाने जंतर-मंतर येथे आंदोलनाचे आवाहन केले होते. मात्र, दिल्ली पोलिसांच्या कडक बंदोबस्तामुळे आंदोलकांना जंतर-मंतरपर्यंत पोहोचण्यात अडथळे आल्याचे वृत्त आहे.

दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांनी पहाटे विमानतळावर सीजेपी नेतृत्वाशी संबंधित अभिजीत दीपके, सौरभ दास आणि आशुतोष रांका यांना ताब्यात घेतले. त्यानंतर जंतर-मंतरकडे जात असलेल्या पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतल्याचा दावा करण्यात आला आहे. या कारवाईमुळे आंदोलनाच्या नियोजनावर परिणाम झाल्याचे सांगितले जात आहे.

या कारवाईदरम्यान आतापर्यंत सुमारे ७००० हजार लोकांना ताब्यात घेण्यात आले असून, दिल्लीमध्ये ३८ हजारांहून अधिक सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

मेट्रो स्थानके बंद करण्याबाबतच्या प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी

दिल्लीतील मेट्रो आणि रेल्वे सेवा पूर्णपणे बंद करण्याच्या निर्णयाविरुद्ध दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे; हा निर्णय न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करणारा असल्याचा आरोप यात करण्यात आला आहे.न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांचे खंडपीठ या प्रकरणावर सुनावणी करेल.

### मुंबई पोलिसांनी २०० जणांना ताब्यात घेतले.

दिल्लीतील आंदोलनांना पाठिंबा देण्यासाठी मुंबईच्या ऑगस्ट क्रांती मैदानावर आंदोलन करणाऱ्या सुमारे २०० लोकांना पोलिसांनी ताब्यात घेतले.अटक केलेल्यांमध्ये तुषार गांधी यांच्या 'हम भारत के लोग' या संघटनेचे सदस्य आणि सीपीआय (एम) च्या कार्यकर्त्यांचा समावेश होता. अधिकाऱ्यांच्य म्हणण्यानुसार, हे लोक परवानगीशिवाय मैदानावर जमून आंदोलन करत होते.

प्रशांत किशोर म्हणाले, सरकार घाबरले आहे

जन सूरजचे संस्थापक प्रशांत किशोर म्हणाले, आज दिल्लीच्या रस्त्यांवर ४०,००० पोलीस, निमलष्करी दल आणि सुरक्षा कर्मचारी तैनात आहेत. यावरूनच सरकार या आंदोलनाला किती घाबरले आहे हे दिसून येते.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आणि एसआयआरच्या विरोधात महाराष्ट्रातील नाशिक येथे मशाल मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनात काँग्रेस, कम्युनिस्ट पक्ष, सीजेपी, आयएसआयएफ आणि विविध विद्यार्थी संघटनांचे कार्यकर्ते व समर्थक सहभागी झाले होते.

पवन खेरा म्हणाले, पोलिसांनी गुरुद्वारात प्रवेश केला.

काँग्रेस खासदार पवन खेरा म्हणाले, गेल्या पाच दिवसांपासून आमच्यासोबत काय घडत आहे, हे तुम्ही पाहिले आहे. ते आता परिस्थिती आणखी चिघळवत आहेत. आज त्यांनी वकिलांना सोडले नाही, पत्रकारांना सोडले नाही, त्यांनी कोणालाही सोडले नाही. ही आणीबाणीची परिस्थिती आहे. पोलिसांनी गुरुद्वारात प्रवेश केला.

### सत्य उघडकीस येईल या भीतीने सरकार घाबरले आहे

प्रियंका गांधी म्हणाल्या, आधी त्यांनी २५४ खासदारांना धक्काबुक्की केली आणि त्यांना पूर्णपणे बेकायदेशीरपणे ताब्यात घेतले, जे त्यांच्या घटनात्मक अधिकारांचे उल्लंघन आहे. विरोधी पक्षांच्या इतर आंदोलकांसोबतही त्यांनी तेच केले. त्यानंतर, त्यांनी देशाच्या राजधानीला घेराव घातला.त्या म्हणाल्या, निवडणुकांमध्ये हेराफेरी करण्यासाठी त्यांनी निवडणूक आयोगाशी संगनमत केले आणि आता त्यांच्या सरकारबद्दलचे सत्य उघडकीस येईल व जनता उत्तरांची मागणी करेल, याची त्यांना भीती वाटते, याचा हा पुरावा नसेल तर मग आणखी काय आहे?

पुण्यात पोलिसांनी १०० आंदोलकांना ताब्यात घेतले

पुणे पोलिसांनी अंदाजे ८० ते १०० आंदोलकांना ताब्यात घेऊन लश्कर पोलिस ठाण्यात नेले.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ताब्यात घेतलेल्या विद्यार्थ्यांना काही तासांत सोडण्यात येईल.

# सावळीविहीर येथील नाला क्रमांक ३० च्या रुंदीकरणास सुरुवात

## जलसंपदा मंत्री विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कामाला गती

शिर्डी प्रतिनिधी:

इंग्रजकालीन गोदावरी उजव्या कालव्यावरील सांडपाणी व्यवस्थापनासाठी असणाऱ्या नाल्यांच्या रुंदीकरण व खोलीकरणाचे काम स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आले आहे. याअंतर्गत सावळीविहीर येथील मैल ४५ मधून जाणाऱ्या नाला क्रमांक ३० च्या कामाला सुरुवात झाल्याने परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

गोदावरी डाव्या आणि उजव्या कालव्यांवर सांडपाणी व्यवस्थापनासाठी असणाऱ्या नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गवत, गाळ, दगड, गोटे आणि चिखल साचला होता. अनेक ठिकाणी अतिक्रमणे झाल्याने



पावसाळ्यात पाणी नाल्याबाहेर पडून शेजारील शेतात तसेच वस्तीत शिरत असे. यामुळे पिकांचे व मालमत्तेचे नुकसान होऊन परिसरात दुर्गंधी पसरत होती. सांडपाणी व्यवस्थापन सुरळीत व्हावे, या उद्देशाने जलसंपदा विभागाकडून या नाल्यांचे रुंदीकरण आणि खोलीकरण करण्यात येत आहे.या कामाची सुरुवात जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता सोनल शहाणे आणि सहाय्यक अभियंता लव्हाट यांच्या उपस्थितीत करण्यात आली. यावेळी माजी सरपंच बाळासाहेब जपे, लोकनियुक्त सरपंच ओमेश जपे, अशोक आगलावे, गणेश आगलावे, विकास जपे, सुनील आगलावे, गणेश कापसे, राजेंद्र गडकरी, सुनील जपे, सुधीर वर्पे, प्रभाकर जपे, दिलीप कापसे, रमेश जपे, जनुका बर्गे, संजय आगलावे, सतीश वाघमारे, राजेंद्र आरोणे आणि बाळू गुंजाळ उपस्थित होते.

# डॉ टी आर काझी यांना निसर्गोपचार गौरव सन्मान



बीड जिल्हा येथील सुप्रसिद्ध निसर्गोपचार तज्ञ डॉ टी आर काझी यांना ४ ऑक्टोबर २०२६ रविवार रोजी आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, ए जी एम ए व योगा निसर्गोपचार चिकित्सक असोसिएशन मार्फत अतिशय प्रतिष्ठेचा निसर्गोपचार गौरव सन्मान २०२६ मोठ्या थाटात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भातृमंडळ हॉल बुलडाणा येथे देण्यात आला.

निसर्गोपचारक यांच्या कार्याचा हा सन्मान होता या सन्मानाला महाराष्ट्रातील शेकडो निसर्गोपचार तज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रमुख पाहुण्यांमध्ये बुलडाणा मतदार संघातील लोकप्रिय आमदार मा.श्री संजयभाऊ गायकवाड, बुलडाणा नगर पालिका नगराध्यक्षा सौ पूजाताई गायकवाड,, डॉ सचिन सुपे, डॉ त्रिदीप गुहा,प्रा. डॉ. प्रशांत कपले, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विदयापीठ, नागपूर.एम जी एम विद्यापीठाचे योगा विभाग प्रमुख श्री गंगाप्रसाद खरात, तर मंचावर प्रमुख उपस्थितीमध्ये आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे व्हाईस चेअरमन श्री नितीनराजे पाटील,आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन राष्ट्रीय अध्यक्ष डॉ बाबुराव कानडे,सौ दिशा चव्हाण,श्री विजय नवल पाटील,श्री विनोद ढोबळे,श्री रावसाहेब घोडेगाव,श्री रामेश्वर शिंदे,श्री.श्रीकांत अंजुटगी,श्री भानुदास परबत,श्री अशोक देवकर,संजय गवारे सौ स्मिता खारकर,श्री राहुल देशमुख,श्री आशिष सूर्यवंशी,व इतर आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन पदाधिकारी उपस्थित होते.डॉ टी आर काझी निसर्गोपचार तज्ञ .. यांना हा कार्याचा *निसर्गोपचार गौरव सन्मान २०२६ मिळाल्या बद्दल* सर्व स्तरावरून डॉ टी आर काझी यांचे कौतुक होत आहे व शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.


तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-९८८ दि.-.-.-

जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **यासेब मुक्तार तांबोळी, रा.साष्ट पिंपळगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **भाचा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अलि वसीम सय्यद | भाचा | ११.०४.२०२५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**मार्क्स मेमो हरवला आहे**

१० वी चा मार्कशीट हरवला आहे. नेहा कैलास धापसे नावाचा १० वी पासची मार्कशीट गढी ते गेवराई प्रवासा दरम्यान हरवली आहे. तरी कोणाला सापडल्यास खालील क्रमांका वर संपर्क साधावा. मो.९३५६६८६०७७




माजलगाव/प्रतिनिधी

गतवर्षीच्या येडेश्वरी कडील थकीत ऊस बिलांचे २०० रुपये प्रतिटन बिलासह चालू हंगामात ४२५० रुपये प्रति टन भावाच्या मागणीसाठी खा. बजरंग बप्पा सोनवणे यांची गाडी अडवली. तब्बल अर्धा तास रस्त्यावर बसून युवा शेतकरी संघर्ष समिती चे पदाधिकारी व कार्यकर्ते घोषणाबाजी करत होते.यावेळी खा.बजरंग सोनवणे यांनी गत वर्षीचे दोनशे रुपये व चालू हंगामात जास्तीत जास्त भाव देण्याचे प्रयत्न करतो असे त्यांनी सांगितले.


तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-११३१ दि.१९.०८.२०२६

जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **प्रकाश प्रल्हाद वाघमारे, रा.हिरडपुरी ता.पैठण जि.संभाजीनगर** यांनी यांच्या **भाची**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अनुश्री गोकुळ सातपुते | भाची | १४.०८.२०२५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२६/सेतु/कावि-८७८ दि.१८.०८.२०२६

जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **रहेमानखान लालखा पठाण रा.धाकलगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **नात**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | नुशरत नदीमखाँ पठाण | नात | ०७.१०.२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**


# वडवणीत नवरात्रोत्सवानिमित्त श्रीमद् देवी भागवत कथा सोहळ्याचे आयोजन

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी शहरातील जय भवानी नगर परिसरात नवरात्रोत्सवानिमित्त श्रीमद् देवी भागवत कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६ पासून सोमवार, दि. १९ ऑक्टोबर २०२६ पर्यंत दररोज दुपारी ३ ते ५ या वेळेत ह.भ.प. अंकिता ताई महाराज माने यांच्या अमृतवाणीतून श्रीमद् देवी भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे.



या धार्मिक सोहळ्याच्या माध्यमातून भाविकांना देवी भागवत कथेचे श्रवण करण्याची संधी मिळणार असून, नवरात्रोत्सवानिमित्त परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. या सोहळ्यात भजन, कीर्तन व विविध धार्मिक कार्यक्रमांचीही रेलचेल राहणार आहे.

कार्यक्रमात पखवाजाची साथ श्री. बापूगुरु महाराज सौंदणे, सिंथेसायझरची साथ श्री. शिवाजी महाराज नांदे, तबल्याची साथ श्री. लक्ष्मण महाराज गायके, तर गायनाची साथ सुमित्रा ताई बींगळे देणार आहेत.

सोमवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी कथा सोहळ्याची सांगता होणार असून, यानिमित्त कल्याचे कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी या धार्मिक सोहळ्याला उपस्थित राहून श्रीमद् देवी भागवत कथेचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.कार्यक्रमाचे स्थळ : जय भवानी नगर, भारत गॅस गोडाऊनजवळ, वडवणी, जि. बीड.विनंती अंकुश महाराज टिपरे (नाथ सेवक).यांनी केली आहे.

# केंद्रीय पथक शेतकऱ्यांच्या बांधावर..!

## यवतमाळ जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी

यवतमाळ ।प्रतिनिधी

यंदाच्या खरीप हंगामात पावसातील खंड आणि पिके करपल्यामुळे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या आंतरमंत्रालयीन केंद्रीय पथकाने आज यवतमाळ जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागांचा दौरा केला. पथकाने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन कापूस, सोयाबीन आणि तूर पिकांची प्रत्यक्ष पाहणी व मूल्यांकन केले. तसेच दुष्काळाचे चटके सोसणाऱ्या शेतकऱ्यांच्या व्यथा, अडचणी आणि मागण्या जाणून घेत त्यांना संकटाशी दोन हात करण्यासाठी धीर दिला.

यंदाच्या खरीप हंगामात पावसाचा खंड पडल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळाचा ट्रिगर-१ लागू केला आहे. बाधित शेतकऱ्यांना राज्य शासनासोबतच केंद्र सरकारकडूनही मदत मिळावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन मदतीची मागणी केली होती. त्यानंतर दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी व नुकसानीचे मूल्यमापन करण्यासाठी केंद्रीय पथक जिल्ह्यात दाखल झाले.

या पथकात केंद्रीय जलसंपदा विभागाच्या संनियंत्रण संचालनालयाचे संचालक तथा पथकप्रमुख अर्जेश कुमार मधोक, वित्त मंत्रालयाच्या व्यय विभागाचे सहसंचालक महेश कुमार, कृषी व शेतकरी कल्याण विभागाच्या अवर सचिव सीमा राणी आणि ग्रामीण विकास विभागाचे अवर सचिव संजय मीना यांचा समावेश होता.

पथकाने यवतमाळ तालुक्यातील मडकोना व लासिना, तसेच नेर तालुक्यातील लोणी, मांडवगड, वटफळी आणि दोडकी या गावांना भेट दिली. यावेळी शेतातील कापूस, सोयाबीन आणि तूर पिकांची पाहणी करून पिकांची सद्यस्थिती, पावसातील खंडामुळे झालेली हानी आणि शेतीसमोरील अडचणींची माहिती घेतली. शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या व अपेक्षा जाणून घेतल्या. दुष्काळी संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना मदतीच्या दृष्टीने केंद्र सरकार सकारात्मक असल्याचा विश्वासही या दौऱ्यातून व्यक्त करण्यात आला.

केंद्रीय पथकाने यवतमाळ शहरातील श्री गौरक्षण संस्थेला भेट देऊन गौशाळेची पाहणी केली. यावेळी



गायींची संख्या, उपलब्ध चारा आणि पशुधनासाठी राज्य शासनाकडून करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती घेतली. पथकातील सदस्यांनी गौशाळेतील गायींना पशुखाद्य भरवून पशुधनाप्रती आपुलकीची भावना व्यक्त केली.

लघुसिंचन प्रकल्पाची पाहणी..

यवतमाळ तालुक्यातील किटा कापरा येथील लघुसिंचन प्रकल्पालाही पथकाने भेट दिली. प्रकल्पातील घटलेल्या पाणीपातळीची स्थिती जाणून घेतली. उपलब्ध पाणीसाठा, पाण्याचे स्रोत, भूजल पातळी तसेच सिंचन प्रकल्प आणि विहिरींची पाणीपातळी वाढविण्यासाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला. दुष्काळी परिस्थितीत पाणी व्यवस्थापनाचे महत्त्व लक्षात घेऊन संबंधित बाबींची माहिती संकलित करण्यात आली.

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांशी संवाद..

दौऱ्यादरम्यान केंद्रीय पथकाने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. शेतीतील संकटे, आर्थिक अडचणी आणि कुटुंबाला भेडसावणाऱ्या समस्यांची माहिती घेतली. जिल्ह्यातील पीक परिस्थिती, शेतकऱ्यांचे नुकसान, पशुधनासाठी चारा उपलब्धता आणि सिंचन व भूजल स्थिती या विविध बाबींच्या प्रत्यक्ष पाहणीच्या आधारे केंद्रीय पथकाकडून अहवाल तयार करून केंद्र सरकारला सादर करण्यात येणार आहे. या अहवालाच्या आधारे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र शासनाकडून मदत मिळण्याबाबत पुढील कार्यवाही होणार आहे.या दौऱ्यात केंद्रीय पथकासोबत जिल्हाधिकारी विकास मीना, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे, यवतमाळ पाटबंधारे मंडळाचे अधीक्षक अभियंता योगेश सोनवणे, उपविभागीय अधिकारी गोपाळ देशपांडे, विजय सुर्यवंशी, यवतमाळ सिंचन मंडळाचे अधीक्षक अभियंता, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे वरिष्ठ भूवैज्ञानिक, जिल्हा जलसंधारण अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता, पशुसंवर्धन उपायुक्त, तहसिलदार, तालुका कृषी अधिकारी, गटविकास अधिकारी आदी उपस्थित होते.

पाटोद्याच्या जयभवानी महाविद्यालयाचा पै. प्रणव आवारे ९० किलो

## ग्रिको कुस्तीत विभागात प्रथम : राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

पाटोदा ।प्रतिनिधी

दि. ११ ऑक्टोबर : पाटोदा येथिल जय भवानी महाविद्यालयाचा विद्यार्थी पै.प्रणव उर्फ गणेश आवारे यांनी शालेय क्रिडा स्पर्धेत महाविद्यालयाचे व पाटोदा तालुक्याचे नाव कुस्ती क्षेत्रात उंचवणारी उल्लेखनीय कामगिरी करत प्रणव आवारे याने ९० किलो वजन गटातील ग्रिको - रोमन कुस्ती प्रकारात मराठवाडा विभागात सर्व प्रथम येण्याचा बहुमान मिळवून जय भवानी महाविद्यालयाच्या शिरपेचात आजुन एक मानाचा तुरा रोवला.या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्याची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

जय भवानी महाविद्यालयाचे विद्यार्थी विविध क्रिडा स्पर्धेमध्ये सातत्याने सहभागी होत असून आपल्या कामगिरीच्या जोरावर महाविद्यालयाची यशस्वी परंपरा. कायम राखत आहेत.ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन व संधी निर्माण करून दिल्यास ते तालुका,जिल्हा,विभागीय,

राज्यस्तरीय,राष्ट्रीय पातळीपर्यंत उतुंग कामगिरी करू शकतात.हे या यशातुन पुन्हा एकदा सिध्द झाले आहे.या कुस्ती स्पर्धेत प्रणव आवारे याने दमदार खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यावर मात करून हा विजय मिळवला आहे.त्याच्या या यशामुळे कुटुंबीय,प्रशिक्षक,ज्ञमित्रपरिवार व कुस्तीप्रेमीकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.प्रणव आवारे यास वस्ताद बाळासाहेब



आवारे,वस्ताद करण आवारे,वस्ताद ज्ञानेश्वर संकुटे क्रिडा विभागाचे प्रा.गोपाळ धांडे,प्रा.डॉ.प्रविण शिलेदार,आदिचे मार्गदर्शन लाभले.कठोर सराव,जिद्द आणि मेहनतीच्या बळावर मिळविलेल्या दैदिप्यमान यशामुळे पै.प्रणव उर्फ गणेश आवारे याचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री मा.श्री.शिवाजीरावदादा पंडित,अध्यक्ष माजी आ.श्री.अमरसिंह पंडित,सचिव,मा.श्री.जयसिंह पंडित,आ.श्री.विजयसिंह पंडित,युवा नेते श्री.रणवीर काका पंडित,युवा नेते श्री.पृथ्वी दादा पंडित,मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम,प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे,विकास समितीचे सदस्य मा.श्री.दिलीपराव जाधव व सर्व प्राध्यापक वृंद यांनी अभिनंदन..!करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा..!दिल्या.

## अंबाजोगाई मैल कामगार जी.पी.एफ.प्रकरणात आर.आर.देशमुखच दोषी कसे...?

अंबाजोगाई / सुनिल सीरसाट

अंबाजोगाई येथील जि.प.बां.उपविभाग कार्यालयात मैल कामगार प्रकरण उघडकीस आल्यानंतर ते देशमुख यांच्या एकट्याच्या माथी मारून जि.प.प्रशासन हात वरती करून तमाशा पाहत आहे.

परंतु हे असे नसून सत्य मात्र वेगळेच असल्याचे आढळून येत आहे. या प्रकरणात आर.आर. उर्फ मुन्ना देशमुख यांची कुठल्याही कागदावरती, फाईल वरती स्वाक्षरी नाहीये. ज्या कोणी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. त्यामध्ये तत्कालीन उपाभियंता तथा कार्यकारी अभियंता सुनील चांदवडकर आणि तदनंतरचे प्रभारी उपअभियंता म्हणून कारभार सांभाळणारे राजेंद्र काळे या दोन वरिष्ठांचा प्रत्यक्ष संबंध येत असताना, आर.आर. (मुन्ना) देशमुख यांच्या एकट्यावरच गुन्हा दाखल करणे कितपत योग्य आहे....? चौकशी समितीच्या अहवालात सुनिल चांदवडकर आणि राजेंद्र काळे या दोघांवरती ठपका ठेवण्यात आलेला असताना सुद्धा केवळ वरिष्ठ लिपीक देशमुख यांच्या एकट्यावरच चौकशीचा बडगा लादून गुन्हा दाखल करणे म्हणजे चोर सोडून संन्याशाला

### सुनील चांदवडकर आणि राजेंद्र काळे काय डोळ्यावर पट्टी बांधून काम करत होते का...??

फाशी....! असाच काहीसा प्रकार असल्याची चर्चा जागोजागी सुरु आहे.

विशेष म्हणजे निवृत्त अभियंता सुनिल चांदवडकर आणि विद्यमान उपअभियंता राजेंद्र काळे यांच्यावर दोषी असल्याचा ठपका ठेवण्यात आल्यानंतरही राजेंद्र काळे यांना पदोन्नती देण्यात आली. आणि तीही अंबाजोगाईलाच..... हे किती नवलय आणि कितपत योग्य आहे.....? सीईओ जतीन रहेमान साहेब जर या प्रकरणात तुम्हाला खरोखरच निःपक्षपाती आणि पारदर्शक चौकशी करायची वा हवी असेल, तर तात्काळ राजेंद्र काळे यांचे निलंबन करण्यात येऊन चौकशी केली. तरच अपेक्षित माहिती समोर येईल आणि खऱ्या दोषी-भ्रष्ट अधिकारी-कर्मचाऱ्याचा पर्दाफाश होऊन सत्यता बाहेर येईल. तेंव्हा बाप दाखव आन श्राद्ध घाल...! याप्रमाणे अगोदर राजेंद्र काळे यांचे निलंबन करूनच मैल प्रकरणाच्या अनुषंगाने त्यांनी केलेल्या



इतरही काळया कारनाम्यांची मालिका समोर येईल. आणि दूध का दूध पानी का पानी होऊन जाईल. तेव्हा या प्रकरणात सी.ई.ओ. साहेब किती पारदर्शकपणे लक्ष घालून चौकशी लावतात आणि नेमकं प्रकरण काय आहे हे समोर आणतात. याकडेच आता संपूर्ण बीड जिल्ह्यासह विशेष करून अंबाजोगाई तालुक्याचे लक्ष लागले आहे...!

## चांगल्या संकल्पनेतून केलेल्या कार्याला नक्कीच यश मिळते -मा.खा.रजनीताई पाटील

गंगा माऊली साखर कारखान्याचा पहिला हप्ता तीन हजार रुपये देणार - लक्ष्मणराव मोरे

गंगा माऊली शुगरचा पाचवा गळीत हंगाम व सी बी जी प्रकल्पाचे भूमिपूजन संपन्न

केज/प्रतिनिधी

गंगामाऊली शुगरच्या पाचव्या गळीत हंगामाला रविवार दि. ११ आक्टोबर रोजी सुरुवात करण्यात आली असून या गळीत हंगामाची सुरुवात काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या मा.खा.रजनीताई पाटील यांच्या हस्ते व चेअरमन लक्ष्मणराव मोरे,ह.भ.प.प्रकाश महाराज बोधले, ह.भ.प.उद्धव बापू आपेगावकर,किरण पाटील,उद्योगपती राजेंद्र बोडखे,मयूर बोडके,आदित्य दादा पाटील,प्रविण मोरे, राहुल सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.यावेळी बोलताना रजनीताई पाटील यांनी अशोकराव पाटील व आपण सुरू केलेल्या कारखान्याची भरभराटी दिवसेंदिवस होत असून हे पाहताना मनोमन आनंद होत असून गंगा माऊली शुगरचे चेअरमन लक्ष्मणराव मोरे यांचे उत्कृष्ट नियोजन लाभल्याने अल्पावधीतच गंगा माऊली कारखाना नावारुपाला आला आहे.आपणही सर्वांनी कारखान्याला सहकार्य करून करावे. कारखाना उभा करण्याची चांगली संकल्पना होती चांगल्या संकल्पनेला यश मिळतेच असे मत रजनीताई पाटील यांनी व्यक्त केले.त्या गंगा माऊली शुगरच्या पाचव्या गळीत हंगामाच्या शुभारंभ प्रसंगी बोलत होत्या.

गंगा माऊली शुगरच्या पाचव्या गळीत हंगामाचा शुभारंभ दत्ता मुळे व त्यांच्या पत्नी या दांपत्याच्या हस्ते पूजा करून करण्यात आला. कारखान्याचे चेअरमन लक्ष्मणराव मोरे यांनी बोलताना सांगितले की,चार वर्षे आपण गाळप यशस्वीपणे पूर्ण केले असून सर्वांचे पेमेंटही वेळेवर दिले आहे.पंधरा दिवसात पेमेंट देण्याचा पायंडा गंगा माऊली शुगरने जिल्ह्यात पाडल्याने शेतकऱ्यांना कारखान्याकडे पैशासाठी चकरा मारण्याची गरज आजपर्यंत भासलेली नाही व यापुढेही तशी वेळ येणार नाही. शेतकऱ्यांना माहिती देण्यासाठी शेतकरी मेळावे घेतले,लागवडी बाबत मार्गदर्शन केले आणि एवढेच नव्हे तर आम्ही ए.आय.तंत्रज्ञान वापरून कारखाना परिसरात शेतीचा प्रयोग करत आहोत भावाची चिंता करू नका पहिला हप्ता तीन हजार रुपये दिला जाणार आहे असे मत लक्ष्मणराव मोरे यांनी व्यक्त केले. कारखान्याने मागच्या गळीत हंगामात देखील रिकव्हरी चांगल्या पद्धतीने जवळपास ११ ची रिक्व्हरी आपल्या कारखान्याने मिळवली.केवळ दोनच दिवस आपल्या साखरेला जादा भाव मिळाला तर लागलीच आपण महालक्ष्मीचा सणाला तो जादा दर देखील ३० रुपये प्रमाणे हप्ता काढून शेतकऱ्यांना दिला. त्यामुळे कारखान्याचा फायदा जेव्हा होईल तेव्हा तो ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पोहोंच केला जातो हे आपलं कर्तव्य आहे.आपण हा कारखाना केवळ शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून चालवत आहोत दर १४ दिवसाला आपण शेतकऱ्यांना ऊस बील देत आहोत यापुढेही ही पध्दत अशीच कायम राहणार असल्याचे लक्ष्मणराव मोरे यांनी सांगितले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कार्यकारी संचालक प्रवीण मोरे यांनी केले त्यांनी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी आपण कर्मचाऱ्यांना बोनस देत आहोत ही प्रथा यापुढे सुरूच राहील कधीही खंडित होणार नाही असे सांगून कर्मचारी हे आमच्या परिवारातील आहेत त्यामुळे त्यांची काळजी देखील गंगामाऊली ग्रुप घेतो आणि आम्ही ती घेऊ असे त्यांनी सांगितले. तर यावेळी बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांनी बोलताना सांगितले की,या परिसरातील एक साखर कारखाना उभा रहावा यासाठी मा. खासदार रजनीताई पाटील आणि अशोकराव




पाटलांनी अनेक वर्षांपूर्वी स्वप्न बघितले होते ते पूर्ण झाले.आता योग्य माणसांच्या हातात कारखाना दिला असून चेअरमन लक्ष्मण मोरे हे लातूर पॅटर्नचे जनक आहेत.सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या चेहऱ्या वर हसू आणणे हे कारखान्याचे ब्रीदवाक्य असून त्याप्रमाणे मागच्या हंगामात जिल्ह्यात सर्वाधिक भाव दिला आहे.यावर्षी ऊस देऊन शेतकऱ्यांनी सहकार्य करावे असे मत व्यक्त केले.

आदित्य दादा पाटील म्हणाले की.गंगा माऊली साखर कारखाना शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध राहील.आपल्या विश्वासाला तडा जाणार नाही असे मत व्यक्त केले.यावेळी ऊस उत्पादनामध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या,वाहतुकीमध्ये अतिशय चोख कामगिरी बजावलेल्या तसेच ऊसतोड कामगारांमध्ये ही असाधारण कार्य केलेल्या सर्व घटकांचा सत्कारही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये ऊस उत्पादक शेतकरी प्रथम क्रमांक सौ.मंगल दिनकर जाधव,द्वितीय क्रमांक विलास भैरवनाथ इंगळे,ट्रॅक्टर वाहतुक ठेकेदार प्रथम क्रमांक बाळासाहेब देवीदास राठोड,द्वितीय क्रमांक

माणिक शंकर आडे, ट्रक वाहतुक ठेकेदार प्रथमक्रमांक रामदास सखाराम आडे,द्वितीय अहेमद अमीन शेख,

मिनी वाहतुक ठेकेदार प्रथम क्रमांक संजय जयसिंग चव्हाण,

द्वितीय अरूण बाबुराव जाधव,मिनी वाहतुक ठेकेदार,बैलगाडीवान प्रथम क्रमांक कैलास दादाराव घुले,द्वितीय बाळु शिवाजी चाळक

यांचा बक्षीस देऊन व हार शाल देऊन सन्मान करण्यात आला.सदरील कार्यक्रमासाठी माजी खा.रजनीताई पाटील, कारखान्याचे चेअरमन लक्ष्मणराव मोरे,ह भ प प्रकाश महाराज बोधले,ह भ प उद्धव बापू आपेगावकर, भाजपचे चिटणीस किरण पाटील,काँग्रेस चे प्रदेश सरचिटणीस आदित्य पाटील,काँग्रेस चे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे,राजेश जाधव पाटील,राजेंद्र बोडके, मयूर बोडके,विखे पाटील चे चेअरमन नवनाथ थोटे,संचालक अविनाश मोरे,यांच्या सह अन्य मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ.हनुमंत सौदागर तर आभार अविनाश आदनाक यांनी मानले.कार्यक्रमा साठी मोठ्या प्रमाणावर ऊस उत्पादक शेतकऱ्यांची उपस्थिती होती.



### स्वाराती रुग्णालयात एमएसएफ जवानां कडून रुग्णांच्या नातेवाईकांना मारहाण केल्याचा आरोप

## महिला व लहान मुलांनाही मारहाण होत असल्याच्या तक्रारी

अंबाजोगाई/प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील (स्वाराती) एमएसएफ सुरक्षा जवानांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाईकांना मारहाण होत असल्याचे आरोप समोर येत असून, महिला आणि लहान मुलांनाही मारहाण केली जात असल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेण्याची मागणी होत आहे.रुग्णालयात यापूर्वी सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी सांभाळणारे माजी सैनिक निवृत्त कर्मचारी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांशी तुलनेने चांगल्या पद्धतीने वागत होते,अशी भावना काही नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.मात्र, सध्याच्या एम एस एफ जवानांच्या वागणुकी बाबत नाराजी व्यक्त होत असून, रुग्णालयात उपचारा साठी येणाऱ्या सर्व सामान्य नागरिकांशी संयमाने आणि माणुसकीच्या भावनेने वागण्याची गरज अधोरेखित केली जात आहे.

रुग्णालय की युद्धभूमी? नागरिकांचा संतप्त सवाल!

रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्था ही रुग्ण, डॉक्टर,वैद्यकीय कर्मचारी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी असते.मात्र, काही जवानांकडून आपण जणू भारत- पाकिस्तान सीमेवर कर्तव्य बजावत असल्याप्रमाणे वर्तन केले जात असल्याची टीका नागरिकांकडून केली जात आहे. उपचारासाठी आलेल्या रुग्णांच्या नातेवाईकां कडे संशयाच्या नजरेने पाहणे,त्यांच्याशी अरेरावी करणे किंवा मारहाण करणे,असे प्रकार घडत असल्यास ते अत्यंत गंभीर आहेत.रुग्णालयात अनेकदा रुग्णाची प्रकृती गंभीर असल्याने नातेवाईक मानसिक तणावा खाली असतात.अशा परिस्थितीत त्यांना समजावून सांगणे, नियमांची माहिती देणे आणि शिस्त राखणे ही सुरक्षा कर्मचाऱ्यांची जबाबदारी आहे. महिला आणि लहान मुलांशीही गैरवर्तन किंवा मारहाण होत असल्याच्या तक्रारी असतील,तर त्यांची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे.प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची मागणीस्वाराती रुग्णालय प्रशासनाने या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित घटनांची चौकशी करावी,सीसीटीव्ही फुटेज तपासावे आणि दोषी आढळणाऱ्या सुरक्षा कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी,अशी मागणी होत आहे. तसेच सुरक्षा जवानांना रुग्ण व नातेवाईकांशी सन्मानपूर्वक वागण्याचे प्रशिक्षण द्यावे आणि रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्था अधिक संवेदनशील करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# घटस्थापनेने वडवणीच्या रेणुकामातेचा शारदीय नवरात्रोत्सव प्रारंभ

## भाविकांच्या रेलचेलने मंदिर परिसर फुलला भक्ती, श्रध्दा आणि उत्साहाचा अमूल्य संगम

वडवणी (प्रतिनिधी) वडवणी परिसराच्या पंचक्रोशीत नवसाला पावणारी माता म्हणून प्रसिध्द असणाऱ्या वडवणी शहरातील भाविक-भक्तांची आराध्यदैवता श्री.रेणुकामाता संस्थान याठिकाणी यंदाही मोठ्या जल्लोषात व हर्षोल्हासात नवरात्रोत्सव साजरा करण्यात येत आहे. काल रविवार रोजी घटस्थापनेने या नवरात्रोत्सवास सुरुवात झाली आहे. सकाळीच रेणुका मातेची विधीवत पूजाअर्चा करुन घटस्थापना करण्यात आली. या मंदिर परिसरामध्ये पहिल्या दिवशीच सकाळीपासून भाविकांची दर्शनासाठी रेलचेल दिसून आली. यावेळी भाविकांच्या उपस्थितीने मंदिर परिसर फुलून गजबजला होता.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी परिसराच्या पंचक्रोशीत नवसाला पावणारी माता म्हणून प्रसिध्द असणाऱ्या वडवणी शहरातील भाविक-भक्तांची आराध्यदैवता श्री.रेणुकामाता संस्थान याठिकाणी यंदाही मोठ्या जल्लोषात व हर्षोल्हासात नवरात्रोत्सव साजरा करण्यात येत आहे. यावर्षीचा नवरात्र महोत्सव काल दि.११ ऑक्टोबर २०२६ रविवार रोजी घटस्थापनेपासून सुरु झालेला आहे. या संपूर्ण



नवरात्रीमध्ये श्री.रेणुकामाता संस्थान यांच्याकडून मातेची विधिवत पूजाअर्चा व जागर करण्यात येणार असून दैनंदिन देवीचा जागरही करण्यात येत आहे. दरम्यान वडवणी परिसराच्या पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांच्या श्रध्दास्थान असलेल्या तसेच भाविकांच्या नवसाला पावणारी आई म्हणून प्रसिध्द असणाऱ्या वडवणी शहरातील ग्रामस्थांची आराध्यदैवता शहरातील दक्षिणेस चिंचवण रोड या परिसरात निसर्गाच्या हिरव्यागार सानिध्यात वसलेल्या श्री.रेणुकामाता संस्थान या ठिकाणी मातेच्या मनोभावे दर्शनासाठी सध्या नवरात्र महोत्सवादरम्यान भाविक मोठी उपस्थिती दर्शवत आहेत. पहिल्या माळेदिवशी रविवार रोजीपासूनच वडवणीसह परिसरातील भाविकांनी उपस्थित राहून रेणुकामातेचे मनोभावे दर्शन घेतले. दररोजच्या सकाळी ७ वाजताच्या व सायंकाळी ७ वाजताच्या मातेच्या आरतीस देखील याठिकाणी महिलांसह भाविकांची उपस्थिती लक्षणीय असते. दि.१७ शनिवार रोजी सायंकाळी ६ वाजता सातव्या माळेला मंदिरापासून मातेची नगरप्रदक्षिणा पालखी मिरवणूक निघेल ती पुढे संपूर्ण शहरातून जात समारोप परत मंदिरात होईल. दि.२० मंगळवार रोजी सायंकाळी ७ वाजता विजयादशमी दसरादिनी मंदिर परिसरात रावणदहन संपन्न होईल. तसेच दि.२५ रविवार रोजी कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने मंदिरात रात्री १२ वाजता दुध महाप्रसाद संपन्न होईल. या नवरात्रोत्सवात सुंदर अशा मंडपामुळे मंदिर परिसर अधिकच सुंदर दिसत असून या ठिकाणी लावण्यात आलेल्या वेगवेगळ्या रंगाच्या विद्युत रोषणाईने रात्री हा परिसर अधिकच आकर्षक व नयनरम्य दिसून येत आहे. तरी या नवरात्रोत्सवाच्या दरम्यान आयोजित सर्व कार्यक्रमांचा सर्व भाविक भक्तांनी अवश्य लाभ घ्यावा असे आवाहनही यावेळी श्री.रेणुकामाता संस्थानाचे संस्थानप्रमुख अण्णा महाराज दुटाळ, राहूल दुटाळ, बाळासाहेब दुटाळ, परशुराम दुटाळ यांनी केले आहे.



## वॉर्ड क्रमांक ९ मध्ये शिलाताई भारतींचा स्तुत्य उपक्रम

# स्वखर्चातून ५५ बेंचचे वाटप

ज्येष्ठ नागरिकांसह महिला आणि नागरिकांना दिलासा सार्वजनिक ठिकाणी बसण्याची सुविधा उपलब्ध

भोकरदन इसरारखान पठाण :- सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांच्या दैनंदिन गरजा ओळखून त्यासाठी पुढाकार घेणे हीच लोकप्रतिनिधींच्या कार्याची खरी ओळख असते.याच भावनेतून भोकरदन नगरपरिषदेच्या वॉर्ड क्रमांक ९ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नगरसेविका सौ.शिलाताई अभिजीत भारती यांनी स्वखर्चातून तब्बल ५५ बेंच उपलब्ध करून देत स्तुत्य उपक्रम राबविला आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे ज्येष्ठ नागरिक महिला आणि परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.वॉर्ड क्रमांक ९ मधील अनेक ज्येष्ठ नागरिक,महिला आणि लहान मुले सकाळी व संध्याकाळी फिरण्यासाठी तसेच मंदिरात दर्शनासाठी बाहेर पडतात.मात्र विश्रांतीसाठी बसण्याची पुरेशी व्यवस्था नसल्याने त्यांची गैरसोय होत होती.ही अडचण लक्षात घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरदचंद्र पवार गटाच्या नगरसेविका शिलाताई भारती यांनी कोणत्याही शासकीय निधीची वाट न पाहता स्वतःच्या खर्चातून ५५ बेंच बसविण्याचा निर्णय घेतला.महादेव मंदिर परिसर,हनुमान मंदिर, गजानन महाराज मंदिर,न्यू हायस्कूल व त्याचे प्रांगण, बुद्ध विहार,मारुती मंदिर परिसर,म्हाडा कॉलनी, सिल्लोड रोड बायपास आणि पुखराज नगर यांसह वॉर्डातील विविध महत्त्वाच्या सार्वजनिक ठिकाणी हे बेंच बसविण्यात आले आहेत. त्यामुळे नागरिकांना बसण्यासाठी आणि थोडा वेळ विश्रांती घेण्यासाठी सोयीची व्यवस्था उपलब्ध झाली आहे.

# भोकरदनच्या पत्रकारितेवर शोककळा ज्येष्ठ पत्रकार रितेश देशपांडे यांचे निधन

वयाच्या ४३ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास पत्रकारिता क्षेत्रातून हळहळ सर्वत्र शोक

भोकरदन इसरारखान पठाण :- भोकरदन शहरातील पत्रकारिता क्षेत्राला मोठा धक्का बसला असून निर्भीड आणि मनमिळाऊ व्यक्तिमत्त्वाचे ज्येष्ठ पत्रकार रितेश रत्नाकरराव देशपांडे मालक यांचे रविवारी दि.११ ऑक्टोबर सायंकाळी ४ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.ते ४३ वर्षांचे होते.त्यांच्या अकाली निधनाने भोकरदन तालुक्यातील पत्रकारिता क्षेत्रात शोककळा पसरली असून पत्रकार बांधवांसह मित्रपरिवार आणि नागरिकांमधून हळहळ व्यक्त होत आहे.भोकरदन शहरातील गणपती गल्ली येथे वास्तव्यास असलेल्या रितेश देशपांडे यांची प्रकृती गेल्या काही दिवसांपासून अस्वस्थ होती.रविवारी दुपारी अचानक त्यांची प्रकृती खालावल्याने त्यांना उपचारासाठी हलविण्यात आले.मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.त्यांच्या निधनाची बातमी समजताच शहरात शोक व्यक्त करण्यात आला.निर्भीड पत्रकारिता आणि मनमिळाऊ स्वभाव ही ओळख रितेश देशपांडे हे भोकरदन तालुक्यातील पत्रकारिता क्षेत्रातील परिचित नाव होते.स्पष्ट भूमिका निर्भीड वृत्ती आणि सर्वांशी आपुलकीने वागण्याच्या स्वभावामुळे त्यांनी पत्रकारिता क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. सहकारी पत्रकारांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध आणि मित्रपरिवारातील त्यांचे स्थान यामुळे त्यांच्या निधनाची बातमी अनेकांसाठी धक्कादायक ठरली.

त्यांच्या निधनाने पत्रकारिता क्षेत्रातील एक परिचित चेहरा हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.त्यांच्या आठवणींना उजाळा देताना सहकारी



पत्रकारांनी दुःख व्यक्त केले.

शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार रितेश देशपांडे यांच्या पार्थिवावर रविवारी रात्री भोकरदन येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी पत्रकार बांधव,नातेवाईक, मित्रमंडळी आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,आई,भाऊ, भावजय असा परिवार आहे. कुटुंबाचा आधार असलेल्या रितेश देशपांडे यांच्या अकाली निधनाने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.भोकरदन तालुका पत्रकार संघासह विविध पत्रकार बांधवांनी त्यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले.दिवंगत रितेश देशपांडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना त्यांच्या कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याचे बळ मिळावे अशी भावना व्यक्त करण्यात आली.

भावपुर्ण श्रध्दांजली

# आंतरभारतीच्या ‘मेरी बात’ उपक्रमात डॉ. दिलीप खेडगीकर यांनी उलगडला जीवनप्रवास

## पत्नी डॉ. सुलभाताई यांच्या प्रश्नोत्तरांनी कार्यक्रम रंगतदार; स्वामी रामानंद तीर्थ यांच्याशी कौटुंबिक नाते असलेल्या ज्येष्ठ नेत्रतज्ज्ञांशी मनमोकळा संवाद

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

माणूस समजावून घेण्याचा अनोखा प्रयत्न असलेल्या आंतरभारती, अंबाजोगाईच्या ‘मेरी बात’ या विशेष उपक्रमात शनिवार, दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी ज्येष्ठ नेत्रतज्ज्ञ डॉ. दिलीप खेडगीकर यांनी आपल्या जीवनप्रवासातील विविध पैलू उलगडले. जुन्या बालक मंदिरातील मानवलोक जनसहयोग कार्यालयात हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

डॉ. दिलीप खेडगीकर हे थोर स्वातंत्र्यसैनिक व शिक्षणतज्ज्ञ स्वामी रामानंद तीर्थ यांचे पुतणे असून, नेत्ररोगतज्ज्ञ म्हणून त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या आयुष्यातील विविध अनुभव, वैद्यकीय क्षेत्रातील वाटचाल, सामाजिक जाणीवा आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन जाणून घेण्याची संधी या कार्यक्रमाच्या माध्यमातून उपस्थितांना मिळाली.

या ‘मेरी बात’ कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे डॉ. खेडगीकर यांच्या पत्नी डॉ. सुलभाताई खेडगीकर यांनी त्यांच्याशी साधलेला संवाद. त्यांनी



विचारलेल्या प्रश्नांमुळे डॉ. खेडगीकर यांच्या जीवनातील अनेक रंजक प्रसंग आणि अनुभवांना उजाळा मिळाला. पती-पत्नीमधील हा सहज, मनमोकळा आणि आत्मीय संवाद उपस्थितांसाठी विशेष भावणारा ठरला. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून कार्यक्रमाला वेगळी रंगत प्राप्त झाली.

आंतरभारती, अंबाजोगाईच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या ‘मेरी बात’ या उपक्रमाचा उद्देश व्यक्तीच्या जीवनप्रवासातून तिचे व्यक्तिमत्त्व, विचार आणि अनुभव समाजासमोर आणणे हा आहे. केवळ व्यक्तीची ओळख करून देण्यापेक्षा तिच्या आयुष्यातील संघर्ष, प्रेरणा आणि जीवनानुभव समजून घेण्याची संधी या उपक्रमातून मिळते.

या कार्यक्रमातून डॉ. दिलीप खेडगीकर यांच्या जीवनप्रवासातील विविध पैलू जाणून घेताना उपस्थितांना अनुभवसमृद्ध संवादाचा आनंद मिळाला. व्यक्तीला समजून घेण्याच्या आणि तिच्या अनुभवांतून प्रेरणा घेण्याच्या आंतरभारतीच्या प्रयत्नातील हा आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन व्यंकटेश जोशी यांनी केले तर व्यंकटेश चामनर यांनी डॉ. दिलीप खेडगीकर यांचे पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या कार्यक्रमासाठी आंतरभारती चे राष्ट्रीय मार्गदर्शक अमर हबीब, आंतरभारती अंबाजोगाई च्या अध्यक्ष प्रो. शैलजा बरुरे, महावीर भगरे, दत्ता वालेकर, वैजनाथ शेंगुळे, तारका वानखडे, व्यंकटेश चामनर, शरद लंगे, गोरख शेंद्रे, यांच्यासह अंबाजोगाई मधील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# उस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाला जास्तीचा दर देण्याचा प्रयत्न करणार-चेअरमन अमरसिंह पंडित

गेवराई (प्रतिनिधी)

चालू गळीत हंगामात पुरेसा पाऊस न झाल्यामुळे ऊस उत्पादनावर आणि कारखान्याच्या कामकाजावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे, अशा परिस्थितीत योग्य नियोजन करून जयभवानी सहकारी साखर कारखाना गळीत हंगाम सुरू करत आहे. साखरेच्या बाजारभावाचा विचार करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त भाव देण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाही जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी दिली. कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांनी अन्य कारखान्यांना ऊस न देता आपल्या हक्काच्या जयभवानी कारखान्याला ऊस देऊन सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या ४४ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ करताना ते बोलत होते.

जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या ४४ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ रविवार, दि. ११ ऑक्टोबर रोजी श्रीक्षेत्र नारायणगड संस्थानचे महंत ह.भ.प. शिवाजी महाराज यांच्या शुभहस्ते, तसेच संचालक गणपत नाटकर यांच्या उपस्थितीत विधिवत पूजन करून करण्यात आला. यावेळी जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, भवानी बँकेचे अध्यक्ष बाप्पासाहेब मोटे, रिपब्लिकन पार्टीचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे छत्रपती संभाजीनगर शहर जिल्हाध्यक्ष मयूर सोनवणे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगन्नाथ काळे, उपसभापती श्रीहरी पवार, खरेदी-विक्री संघाचे सभापती जयदीप औटी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

जयभवानी कारखाना शेतकऱ्यांसाठी कामधेनू - महंत शिवाजी महाराज

शुभाशीर्वादपर भाषणात महंत ह.भ.प. शिवाजी महाराज यांनी जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले की, शिवछत्र परिवार पुण्यवान आहे. शिवाजीराव दादांनी वारकरी संप्रदायाचा आदर करत सदाचार आणि सेवाभाव जपला. गोरगरीबांसाठी काम करताना सर्वांना सोबत घेऊन जाण्याची भूमिका त्यांनी कायम ठेवली.

'एकमेका सहकार्य करू, अवघे धरू सुपंथ' या भावनेतून जयभवानी कारखान्याची उभारणी करून शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवून आणली. जयभवानी सहकारी साखर कारखाना हा गेवराई तालुका आणि परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी कामधेनू आहे. कारखान्याची प्रगती उत्तरोत्तर होत राहण्यासाठी सर्वांनी सहकार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी बोलताना अमरसिंह पंडित पुढे म्हणाले की, यंदा पावसाचे प्रमाण पुरेसे नसल्याने ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर उद्योगासमोर आव्हाने उभी राहिली आहेत. अशा परिस्थितीत उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करून गळीत हंगाम यशस्वी करण्यासाठी कारखाना प्रयत्नशील आहे. शेतकऱ्यांनी कारखान्याशी असलेले नाते अधिक दृढ करून ऊस पुरवठ्यात सातत्य ठेवावे. कारखान्याच्या प्रगतीतून परिसरातील शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती साधली जावी, हा उद्देश असल्याचे अमरसिंह पंडित यांनी स्पष्ट केले.

साखरेच्या बाजारातील दरांचा विचार करून शेतकऱ्यांना अधिकाधिक आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कारखान्याच्या अडचणीच्या काळात सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, कामगार, कर्मचारी आणि ऊस तोडणी व वाहतूक ठेकेदार यांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी संचालक जगन्नाथ शिंदे, आप्पासाहेब गव्हाणे, डॉ. आसाराम मराठे, नारायणराव नवले, संभाजी पवळ, गणपत नाटकर, सुनील पाटील, श्रीराम अरगडे, राजेंद्र वारंगे, संदीपान दातखीळ, जगन्नाथ दिवाण, कुमारराव ढाकणे, शरद चव्हाण, भीमराव मोरे, रावसाहेब देशमुख, जगन्नाथ काळे, बाबुराव काकडे, शंकरबप्पा तौर, साहेबराव चव्हाण, डॉ. विजयकुमार घाडगे तसेच विकास सानप, चंद्रकांत पंडित, बाप्पासाहेब पंडित, फुलचंद बोरकर, दीपक आतकरे, सुभाष मस्के, अशोकराव पंडित, गजानन काळे, शांतीलाल पिसाळ, सचिन मोटे, दादासाहेब घोडके, शाम मुळे आणि अशोक नाईकवाडे यांच्यासह

कारखान्याचे जनरल मॅनेजर दत्तात्रय टेकाळे, कार्यकारी संचालक राजेंद्र खाडप, मुख्य अभियंता अशोक होके, उपमुख्य अभियंता ऋषिकेश देशमुख, प्रॉडक्शन मॅनेजर गजानन वाळके, मुख्य लेखापाल सौरभ कुलकर्णी, मुख्य शेतकी अधिकारी शेखर थावरे, डिस्टिलरी इन्चार्ज राजेंद्र बडे, सिव्हिल इंजिनिअर भालचंद्र कुलकर्णी, सुरक्षा अधिकारी एस. एन. औटे, संगणक विभागाचे धनाजी भोसले, खरेदी विभागाचे सुशांत सोळंके आणि ऊस पुरवठा अधिकारी वच्छिष्ट कुटे यांच्यासह कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी, कामगार, सभासद, ऊस उत्पादक शेतकरी आणि ऊस तोडणी व वाहतूक ठेकेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या ४४ व्या गळीत हंगामाच्या शुभारंभामुळे आगामी हंगामात कारखान्याचे कामकाज सुरळीत चालावे आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या उसाला चांगला दर मिळावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.



# महाराष्ट्र योग असोसिएशनचे अध्यक्ष विकास गवते यांचा राजस्थानचे उपमुख्यमंत्री प्रेमचंद बैरवा यांच्या हस्ते सन्मान

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) योगासन खेळाच्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानास्पद ठरणारा प्रसंग जयपूर, राजस्थान येथे घडला. योगा फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या वतीने जयपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या ५१ व्या राष्ट्रीय ज्युनिअर व सब ज्युनिअर योगासन स्पर्धेदरम्यान महाराष्ट्र योग असोसिएशनचे अध्यक्ष श्री. विकास गवते यांचा राजस्थानचे उपमुख्यमंत्री श्री. प्रेमचंद बैरवा यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या सन्मानामुळे महाराष्ट्रातील योगासन क्षेत्रातील कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेल्याचे चित्र पाहायला मिळाले.

योगा फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या राष्ट्रीय स्पर्धेत देशातील विविध राज्यांतील ज्युनिअर व सब ज्युनिअर गटांतील खेळाडूंना आपले योगासन कौशल्य सादर करण्याची संधी मिळाली. योगासन या क्रीडाप्रकाराचा प्रसार, प्रचार आणि खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने अशा स्पर्धांना विशेष महत्त्व आहे. योगासनाच्या माध्यमातून शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक एकाग्रता, शिस्त आणि संतुलित जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित केले जाते.

महाराष्ट्र योग असोसिएशनचे अध्यक्ष श्री. विकास गवते यांचा राजस्थानचे उपमुख्यमंत्री श्री. प्रेमचंद बैरवा यांच्या हस्ते करण्यात आलेला सन्मान हा महाराष्ट्रातील योगासन क्षेत्रासाठी गौरवास्पद मानला जात आहे. योगासनाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या पदाधिकाऱ्यांना अशा प्रकारे राष्ट्रीय स्तरावर सन्मानित केल्यामुळे या खेळाच्या विकासासाठी कार्य करणाऱ्यांना प्रोत्साहन मिळते.



तसेच नवोदित खेळाडूंनाही योगासनाच्या क्षेत्रात अधिक मेहनत घेऊन प्रगती साधण्याची प्रेरणा मिळते.

राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेच्या निमित्ताने विविध राज्यांतील खेळाडू, प्रशिक्षक आणि योगासन क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांना एकत्र येण्याची संधी मिळाली. अशा स्पर्धांमुळे खेळाडूंमधील कौशल्यविकासाबरोबरच क्रीडाभावना, शिस्त आणि परस्पर सहकार्याची भावना वृद्धिंगत होण्यास मदत होते.

जयपूर येथे झालेल्या या कार्यक्रमात महाराष्ट्र योग असोसिएशनचे अध्यक्ष श्री. विकास गवते यांचा राजस्थानचे उपमुख्यमंत्री श्री. प्रेमचंद बैरवा यांच्या हस्ते झालेला सन्मान हा महाराष्ट्राच्या योगासन क्षेत्राच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला आहे.

# आषाढी वारी झाली , झाला श्रावणी शिव जागर

## आता देवीचा नवरात्रोत्सव उदो उदो बोला !

### कालिका देवीचा नवरात्रोत्सव आजपासुन मोठ्या उत्साहात प्रारंभ !

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर कासार येथील सकल कासार समाजाचे कुलदैवत तथा सर्वांचे श्रध्दास्थान नवसाला पावणा-या कालिका देवीचा नवरात्रोत्सव आजपासुन वै.आबादेव महाराज यांचेपश्चात सिध्देश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद गिरीजी व आता उत्तराधिकारी महंत विवेक महाराज शास्त्री यांचे मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात सुरू होत असुन भक्तिचा जागर आणि गोंधळ देवीभक्तासाठी पर्वणी मानली जाते .

विश्वस्त मंडळांची जय्यत तयारी पुर्ण झाली आहे .आषाढी वारीचा महासोहळा त्यानंतर श्रावणात शिवालयात हर हर महादेवाचा गजर झाल्यानंतर देवीचा नवरात्रोत्सव आजपासुन सुरू होतोय , सर्वत्र शक्तिपिठ ही सज्ज झाली त्याप्रमाणे कालिका देवी मंदिरात देखील नवरात्र नव्या रूपात नव्या वैभवात साजरी होत आहे .

जवळपास सातशे साडेसातशे वर्षापुर्वीचे हेमाडपंथी मंदिर सिंदफना नदीकिनारी पुर्वाभिमुख असुन सिध्देश्वर आणि कालिका मंदिर हे समकालीन असल्याची मान्यता असुन शिव शक्तिचे अधिष्ठान असलेली शिरूर नगरी व पंचक्रोशी महाशिवरात्र व नवरात्र मोठ्या उत्साहात साजरी केली जाते.

कालिका देवीची अख्याईका !

जाज्वल्य शक्तिपिठ म्हणून अनुभुती ,नवसाला पावणारी व ईच्छापुर्ती करणारी देवी , सिंदफना नदितून मागणीप्रमाणे भांडे निघत होती मात्र कालपरत्वे ती भांडी निघणे बंद झाली याचे कारण देखील तसेच रंजक सांगितले जाते ,नदिपात्रात असलेल्या डोहात नथीवाला मासा होता असी देखील अख्याईका सांगितली जाते .

कालिका देवीचे वेगळे वैशिष्ट्य!

देवीच्या मुर्तीची चल प्रतिष्ठापना असल्याने वर्षभरात तीन वेळा मुख्य मुर्ती उत्सव काळात मंदिराचे बाहेर दोन वेळा सिंदफना नदिकाठी व सिमोलंघन करण्यासाठी सिध्देश्वर मंदिरावर नेली जाते यास शिव शक्तिची भेट देखील मानले जाते .

लोकसहभागातून मंदिराचा विस्तिर्ण विस्तार !

पुर्वी छोटेखानी असलेल्या मंदिराचा मागिल तीन दशकापासुन मोठा विस्तार झाला असुन सर्व सुख सोई निर्माण



केल्या आहेत ,त्यात दगडी दिपमाळ आणि दगडी मुख्य महाद्वार सर्वांचेच लक्ष वेधून घेत असते या महाद्वाराला सागवानी भव्य दरवाजा ॲड भाग्यश्री ढाकणे यांनी समर्पित केला आहे याशिवाय देवीला चांदिची प्रभावळ स्व . गणपतराव गाडेकर यांचे स्मरणार्थ अर्पण केली तर देवीला सुवर्ण मुगुट शरद भांडेकर व त्यांच्या बंधुनी मोठ्या श्रध्देने दान केला आहे ,धाराशिवच्या व शिरूरची माहेरवाशिणी असलेलेल्या अंजलीताई जगधने यांनी मोठा पितळी सिह दान देऊन वैभवात भर घातली आहे .

सालाबाद प्रमाणे याहि वर्षी विश्वस्त मंडळाने पुर्ण तयारी केली असुन या कालावधीत पहाटे काकडा भजन ,सामुहिक ज्ञानेश्वरी पारायण ,सप्तशती पाठ ,दोन वेळा फराळ ,चार ते पांच प्रवचन ,हरिपाठ व नंतर सामुहिक महाआरती व आठ ते दहा या वेळेत देवीभागवत कथा होणार आहे .

विश्वस्त मंडळ व तरूणाईचा सहभाग !

मंदिरात धरणेकरी महिला पुरूष निवास फराळ व चहापान असी सर्व सुविधा केली असुन यासाठी भाविकांचे योगदान लाभत असल्याचे विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष रोहिदास पाटील यांनी सांगितले शिवाय सचिव बापुराव गाडेकर उपाध्यक्ष गोविंद पाटील यांचेसह सर्व विश्वस्त मंडळ व तरूणाई यात आपले मोठे योगदान देत असल्याचे सांगितले गेले .

# घनसावंगी पंचायत समिती इमारत दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करा

### निकृष्ट बांधकामाच्या आरोपांची चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी मृत मजुराच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्याची मागणी

घनसावंगी मारोती सावंत :- घनसावंगी येथील पंचायत समिति इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचा काही भाग कोसळून मजूर आनंद भरपूर यांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना ४ ऑक्टोबर २०२६ रोजी घडली. या दुर्घटनेमुळे बांधकामाच्या गुणवत्तेचा आणि कामाच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी शिवसेना शिव उद्योग सहकार सेना चे प्रदेशाध्यक्ष रामेश्वर प्रभाकरराव वाढेकर यांनी केली आहे.या मागणीसंदर्भात वाढेकर यांनी राज्याचे गृह, ग्रामविकास व पंचायत राज राज्यमंत्री योगेश कदम यांना प्रत्यक्ष निवेदन सादर केले.या प्रकरणाची तातडीने चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

बांधकामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह मिळालेल्या माहितीनुसार घनसावंगी येथील पंचायत समिती इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचे बांधकाम सुरू असताना अचानक काही भाग कोसळला.या दुर्घटनेत रुई ता. अंबड येथील मजूर आनंद भरपूर हे ढिगाऱ्याखाली दबले गेले. त्यात त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने बांधकामस्थळावरील सुरक्षिततेच्या उपाययोजना आणि कामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.संबंधित निवेदनात इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच ठेकेदार जिल्हा परिषदेचे शाखा अभियंता,उपअभियंता आणि संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. आर्थिक गैरव्यवहार आणि संगनमताच्या आरोपांचीही सखोल तपासणी व्हावी अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे.मात्र या आरोपांची अधिकृत चौकशीतून पडताळणी होणे आवश्यक आहे.

कुटुंबाचा आधार हरपला मदतीची मागणी

मृत मजूर आनंद भरपूर हे गरीब कुटुंबातील एकमेव कमावते व्यक्ती असल्याचे निवेदनात म्हटले आहे. त्यांच्या मृत्यूमुळे कुटुंबावरील आर्थिक संकट अधिक गडद झाले असून त्यांच्या पश्चात लहान मुलांचा सांभाळ आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.या पार्श्वभूमीवर पीडित कुटुंबाला शासनाकडून तातडीने भरीव आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली



आहे.तसेच दुर्घटनेमागील नेमकी कारणे स्पष्ट होईपर्यंत संबंधित इमारतीचे बांधकाम थांबवून इमारतीच्या सुरक्षिततेची तांत्रिक तपासणी करावी अशी मागणीही करण्यात आली आहे.दोषींवर कारवाई होणार का या प्रकरणातील दोष निश्चित करण्यासाठी बांधकामाचा दर्जा वापरण्यात आलेले साहित्य मंजूर आराखडा तांत्रिक देखरेख आणि सुरक्षा नियमांचे पालन यांची तपासणी होणे गरजेचे आहे.केवळ चौकशीचे आदेश देऊन न थांबता चौकशीचा अहवाल सार्वजनिक करून जबाबदार व्यक्तींवर नियमानुसार कारवाई करावी अशी मागणी पुढे येत आहे.

या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, जालना जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पाठविण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.एका मजुराचा बळी गेलेल्या या दुर्घटनेतून बांधकामातील त्रुटी समोर येणार का पीडित कुटुंबाला न्याय व आर्थिक आधार मिळणार का आणि जबाबदारी निश्चित होणार का याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# सफा शेखची नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी निवड

## जिल्हा व विभागीय स्तरावर चमकदार कामगिरी

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील साबलखेड येथील सर्वसामान्य कुटुंबातील सफा शेरअली शेख या विद्यार्थिनीने रायफल शूटिंग या क्रीडा प्रकारात उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय स्पर्धेत धडक मारली आहे. वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी जिल्हा व विभागीय स्तरावर आपल्या कौशल्याची छाप पाडत तिने राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. तिच्या या यशामुळे साबलखेडसह आष्टी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



जिल्हा क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य आणि अजिंठा रायफल शूटिंग क्लब, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजीनगर येथे जिल्हास्तरीय व विभागीयस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सफा शेख हिने आपल्या नेमबाजी कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. अचूक नेम साधण्याची क्षमता, एकाग्रता आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर तिने दोन्ही स्तरांवर आपली गुणवत्ता सिद्ध केली. या कामगिरीच्या बळावर तिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सफा शेख ही कडा येथील महावीर मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये इयत्ता सातवीत शिक्षण घेत आहे. अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही तिने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. रायफल शूटिंगसारख्या कौशल्य, एकाग्रता आणि संयमाची आवश्यकता असलेल्या खेळात तिने मिळवलेले यश विशेष कौतुकास्पद मानले जात आहे. तिला टीम टॉपर रायफल शूटिंग क्लबचे प्रशिक्षक अहमद पठाण सर यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

सफा शेख हिची निवड

दिनांक २२ व २३ ऑक्टोबर २०२६ रोजी नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी झाली आहे. या स्पर्धेतही उत्कृष्ट कामगिरी करून यशाची परंपरा कायम ठेवण्याचा तिचा प्रयत्न राहणार आहे. जिल्हा व विभागीय स्तरावरील यशानंतर आता राज्यस्तरावर आपल्या नेमबाजी कौशल्याची चुणूक दाखविण्याची संधी तिला मिळाली आहे.

सर्वसामान्य कुटुंबातून पुढे येत सफा शेख हिने मिळवलेले यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. तिची आई अंजुम शेख आणि वडील शेरअली शेख हे तिला सातत्याने प्रोत्साहन देत असून तिच्या क्रीडा प्रवासात मोलाची साथ देत आहेत. पालकांचे प्रोत्साहन, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर सफाने राज्यस्तरीय स्पर्धेपर्यंत मजल मारली आहे.

सफा शेख हिची राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल आमदार सुरेश धस, माजी आ. भीमराव धोंडे, माजी आ. बाळासाहेब आजबे, ज्येष्ठ पत्रकार प्रा. निसार शेख, युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, पत्रकार जावेद पठाण, राजेंद्र लाड, तेजवार्ता न्यूज नेटवर्कचे संपादक सय्यद बबलू, जनता उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सय्यद अयुब सर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी तिचे अभिनंदन केले आहे. तसेच नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तिला शुभेच्छा दिल्या आहेत. सफा शेख हिने मिळवलेले यश हे तिच्या मेहनतीचे, जिद्दीचे आणि योग्य मार्गदर्शनाचे फलित असून, राज्यस्तरीय स्पर्धेतही ती उत्तम कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# केज येथील श्री बालाजी मंदिरात शारदीय नवरात्र महोत्सवाचे आयोजन

### विविध धार्मिक व कीर्तन कार्यक्रमांची रेलचेल

केज/प्रतिनिधी

केज येथील शुक्रवार पेठ भागातील प्रसिद्ध श्री बालाजी मंदिर देवस्थान येथे रविवार दि.११ ऑक्टोबर २०२६ ते शुक्रवार दि. २३ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत श्री शारदीय नवरात्र महोत्सव उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या महोत्सवा निमित्त मंदिरात विविध धार्मिक विधी,हरिपाठ, महाआरती,नामांकित कीर्तनकारांची कीर्तन सेवा आणि पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवा दरम्यान दररोज सायंकाळी ५-०० वाजता श्री विष्णुसहस्त्रनाम स्तोत्र पठण,सायंकाळी ६-०० वाजता हरिपाठ आणि रात्री ८-०० वाजता महाआरती संपन्न होणार आहे. तसेच दररोज रात्री ९-०० ते ११-०० या वेळेत राज्यभरातील नामांकित कीर्तनकारांची कीर्तन सेवा होणार आहे.

कीर्तन महोत्सवाची रूपरेषा पुढील प्रमाणे आहे.दि.११ व १२ ऑक्टोबर रोजी ह.भ.प.लक्ष्मीकांत महाराज सेवलीकर छत्रपती संभाजीनगर यांची नारदीय कीर्तन सेवा होणार आहे.दि.

१३ ऑक्टोबर रोजी ह.भ.प.शामसुंदर महाराज पांचाळ लाडेवडगाव यांची वारकरी कीर्तन सेवा होणार आहे.दि.१४ ऑक्टोबर रोजी रामायणाचार्य ह.भ.प. गणेश महाराज बांगर आळंदी देवाची यांची कीर्तन सेवा होणार आहे.दि.१५ व १६ ऑक्टोबर रोजी ह.भ.प.योगीराज महाराज गोंदीकर श्री गुरुदत्त धाम,गोंदी यांची नारदीय कीर्तन सेवा होणार आहे.दि. १७ ऑक्टोबर रोजी बालकीर्तनकार ह.भ.प.आकाश महाराज सुरवसे डोणगाव फाटा यांची कीर्तन सेवा संपन्न होणार आहे.दि.१८ व १९ ऑक्टोबर रोजी ह.भ.प.कु.दिपालीताई रघुनाथ कुलकर्णी परतूर यांची नारदीय कीर्तन सेवा संपन्न होणार आहे.दि.२० ऑक्टोबर रोजी विजयादशमी (दसरा) या दिवशी वारकरी रत्न ह.भ.प.प्रमोद महाराज पवार चंदनसावरगाव यांचे विशेष विजयादशमी निमित्ताने कीर्तन रात्री १० ते १२ या वेळेत संपन्न होणार आहे.दि.

२१ ऑक्टोबर रोजी भारुड सम्राट ह.भ.प. सतीश महाराज पांचाळ लातूर यांचा विनोदी भारुडाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे.दि.२२ ऑक्टोबर रोजी ह.भ.प.जालिंदर दादा नेहरकर अध्यक्ष, निष्काम कीर्तन सेवा मंडळ,केज बीड यांची कीर्तन सेवा होणार आहे.भव्य पालखी मिरवणूक व सांगता ही

उत्सवाच्या सांगतादिनी म्हणजेच शुक्रवार



दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ४-०० वाजता श्री बालाजी महाराजांची भव्य पालखी मिरवणूक निघणार आहे. त्या नंतर उत्तर रात्री तीर्थप्रसाद वाटपाने या महोत्सवाची सांगता होईल.या संपूर्ण सोहळ्यात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा व कीर्तन श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री बालाजी मंदिर देवस्थानचे विश्वस्त मंडळ,पुजारी मंडळ आणि सहकारी भक्त गणांच्या वतीने करण्यात आले आहे.

# वर्षभरातच रस्ते उखडले ; दुसऱ्या तपासणीचा अहवाल अद्याप अप्रकाशित

### केज ऊस गळीत हंगामानंतर रस्त्यांची दुरुस्ती करण्याचे कार्यकारी अभियंत्यांचे निर्देश अहवाल जाहीर करण्याची मागणी

केज/प्रतिनिधी

मुख्यमंत्री ग्रामसडक योजना व प्रधानमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत करण्यात आलेले चंदनसावरगाव -जवळबन,सावळेश्वर -आवसगाव-नायगाव आणि जवळबन- लाडेगाव हे रस्ते अवघ्या एका वर्षातच उखडल्याने रस्त्यांच्या कामांच्या गुणवत्तेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यां सह ग्रामस्थ,शेतकरी आणि आंदोलक प्रतिनिधींनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन संयुक्त पाहणी केली. या रस्त्यांची दुसऱ्यांदा तपासणी झाली असली,तरी तपासणीचा अहवाल अद्याप सार्वजनिक करण्यात आलेला नाही.या संयुक्त पाहणी वेळी मुख्यमंत्री प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता श्री.एम.एम. पाटील,उपविभागीय अभियंता श्री.शिंदे, कनिष्ठ अभियंता श्री. मते,क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष श्री. कुलदीप करपे, आंदोलक प्रतिनिधी, ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते.पाहणी दरम्यान संबंधित रस्त्यांवरील खडीकरण व डांबरीकरणाच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले.रस्ते तयार झाल्यानंतर अवघ्या वर्षभरातच त्यांची दुरवस्था झाल्याने कामांच्या गुणवत्तेची सखोल चौकशी करण्याची गरज व्यक्त होत आहे.दरम्यान, दुसरी तपासणी होऊन ही तिचा अहवाल सार्वजनिक झालेला नसल्याने या तपासणीत नेमके काय निष्पन्न झाले? कामातील त्रुटींना कोण जबाबदार आहे आणि संबंधित कंत्राटदारांवर काय कारवाई होणार?असे प्रश्न उपस्थित होत आहेत.तपासणी अहवाल सार्वजनिक करून रस्त्यांच्या कामांचा दर्जा आणि जबाबदारी याबाबत स्पष्टता आणण्याची मागणी होत आहे.या पार्श्वभूमीवर कार्यकारी अभियंता श्री.एम.एम. पाटील यांनी आगामी



ऊस गळीत हंगाम संपल्यानंतर संबंधित रस्त्यांची नव्याने दुरुस्ती व डांबरीकरण करण्याचे निर्देश सिद्धेश्वर कन्स्ट्रक्शन, धाराशिव आणि राज कन्स्ट्रक्शन,केज या कंत्राटदारांना दिले आहेत.

दुरुस्तीचे आश्वासन मिळाले आता अहवालाचे काय?

रस्त्यांच्या दुरुस्तीचे निर्देश देण्यात आले असले,तरी दुसऱ्या तपासणीचा अहवाल अद्याप सार्वजनिक न झाल्याने पारदर्शकते चा मुद्दा महत्त्वाचा ठरत आहे.रस्त्यांच्या कामांचा दर्जा तपासणी अहवालातून स्पष्ट व्हावा,संबंधित त्रुटींची जबाबदारी निश्चित व्हावी आणि दुरुस्तीचे काम दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा ग्रामस्थ व शेतकरी व्यक्त करत आहेत.

# दुष्काळग्रस्तांच्या बांधावर छावा शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी लढण्याचा विजय घाडगे पाटलांचा शब्द

### हेक्टरी एक लाखांच्या मदतीची मागणी १७ ऑक्टोबरला तावशी ताड येथे सरकारविरोधात जागरण-गोंधळ

भोकरदन इसरारखान पठाण :- मराठवाड्यात पावसाच्या खंडामुळे खरीप हंगामातील सोयाबीन,कापूस आणि मक्याची पिके करपून गेली असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या भीषण परिस्थितीत शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी अखिल भारतीय छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे पाटील यांनी थेट बांधावर धाव घेतली. भोकरदन तालुक्यातील सिपोरा,बोरगाव,वरुड खुर्द आणि बरांजळा साबळे या गावांचा दौरा करून त्यांनी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष करण्याचा शब्द दिला.त्यांच्या या दौऱ्यामुळे दुष्काळाच्या प्रश्नाला पुन्हा एकदा धार आली आहे.शुक्रवारी ९ ऑक्टोबर रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या या दौऱ्यात शेतकऱ्यांनी पिकांच्या नुकसानीची व्यथा मांडली. बियाणे,खते आणि मशागतीसाठी हजारो रुपये खर्च करूनही उत्पादनाची आशा मावळली आहे. शेतकऱ्यांच्या या संकटावर केवळ सहानुभूती नको तर ठोस आर्थिक मदत हवी अशी भूमिका घाडगे पाटील यांनी मांडली.हेक्टरी एक लाख रुपये मदत द्या

बरांजळा साबळे येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना घाडगे पाटील यांनी दुष्काळी मदतीच्या मुद्द्यावर सरकारला धारेवर धरले.त्यांच्या म्हणण्यानुसार छावा संघटनेच्या उपोषणामुळे दुष्काळ जाहीर करण्यासाठी सरकारवर दबाव निर्माण झाला.मात्र केवळ दुष्काळ जाहीर करून आणि मर्यादित मदतीची घोषणा करून शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत.मागील अतिवृष्टीत जमिनी खरडून जाणे विहिरी बुजणे अशा नुकसानीनंतरही अनेक शेतकरी मदतीपासून वंचित राहिल्याचा आरोप त्यांनी केला.यंदा शेतकऱ्यांना प्रति हेक्टर एक लाख रुपये मदत जाहीर करावी अशी मागणी त्यांनी केली.



या मागणीसाठी १७ ऑक्टोबर रोजी तुळजाभवानीचे दर्शन घेऊन तावशी ताड येथे सरकारविरोधात जागरण-गोंधळ आयोजित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.या आंदोलनासाठी सर्वपक्षीय नेते शेतकरी नेते रविकांत तुपकर आणि विविध संघटनांना निमंत्रित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

हवामान अभ्यासक पंजाब डख यांच्या अंदाजांवर टीका करताना घाडगे पाटील यांनी पेरणीच्या नियोजनाबाबत शेतकऱ्यांची दिशाभूल होऊ नये अशी भूमिका मांडली. जूनमध्ये पेरणी घाईने करू नका या सल्ल्यानंतर उशिरा पेरणी केलेल्या शेतकऱ्यांचे सोयाबीन करपल्याचा दावा त्यांनी केला.हवामानविषयक अंदाज देताना शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार व्हावा असे ते म्हणाले.

एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनालाही पाठिंबा

पुण्यातील एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा उल्लेख करत त्यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांनाही पाठिंबा दर्शविला.पेपरफुटी प्रकरणात जबाबदार व्यक्तीवर कारवाई करून संबंधित पदावरून हटविण्याबाबत सरकारने ठोस निर्णय घ्यावा अशी मागणी त्यांनी केली.

पिकांच्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून पात्र शेतकऱ्यांना मदतीचा लाभ मिळावा यासाठी छावा संघटना शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.या दौऱ्यात मराठवाडा संपर्कप्रमुख सिद्धाजी जगताप,जालना जिल्हाध्यक्ष संदीप ताडगे पाटील,विविध पदाधिकारी, शेतकरी आघाडीचे प्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

दुष्काळाच्या झळांनी होरपळणाऱ्या शेतकऱ्यांना आता आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष मदतीची प्रतीक्षा आहे. त्यामुळे आगामी आंदोलनातून सरकार कोणती भूमिका घेते आणि शेतकऱ्यांच्या मागण्यांवर काय निर्णय होतो याकडे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.



# बदनापूर विधानसभा एकात्मिक आरोग्य विर्थिनी समितीच्या सदस्य पदी सुरेश पाटील लहाने यांची

बदनापूर (प्रतिनिधी)

राज्यातील आरोग्य विषयक उपक्रम लोकाभिमुख गमिन व बळकट करण्यासाठी एकात्मिक आरोग्य विर्थिनी समिती विधानसभा क्षेत्र निहाय करण्याबाबत स्थापना सूचना देण्यात आल्या आहेत त्यानुसार बदनापूर =अंबड विधानसभा मतदारसंघातील एकात्मिक आरोग्य विर्थिनी समिती आमदार नारायण कुचे यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी स्थापन करण्यात आली त्या समितीच्या सदस्य पदी माननीय श्री सुरेश पाटील लहाने यांची नियुक्ती करण्यात आलीसदर समितीच्या वेळोवेळी होणाऱ्या बैठकी बाबत अवगत करण्यात येईल आरोग्य समितीवर निवड झाल्यामुळे गेवराई बाजार सर्कलमध्ये सुरेश पाटील लहाने यांचे भाजपा राष्ट्रवादी शिवसेना कार्यकर्त्याकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा

# सुशील घोटे पाटील यांना प्रचंड बहुमताने विजयी करा - अनुप कुसुमकर

पक्ष नको...संघटना हवी यावर पदवीधर ठाम

परळी / प्रतिनिधी

पक्ष नको....संघटना हवी प्रश्न पदवीधरांचा आवाज संघटनेचा या घोषवाक्यासह मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे मराठवाडा शिक्षक संघटनेचे अधिकृत उमेदवार सुशील घोटे पाटील यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन मराठवाडा शिक्षक संघटनेचे तालुका अध्यक्ष अनुप कुसुमकर यांनी केले आहे.सुशील घोटे पाटील यांना शिक्षक संघटनेने अधिकृत उमेदवारी दिली असून, पदवीधरांचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि युवकांच्या अपेक्षांना न्याय देण्यासाठी त्यांना पाठबळ देण्याचे आवाहन कुसुमकर यांनी केले.

पदवीधरांच्या विविध समस्या, युवकांसाठी रोजगाराच्या संधी, शैक्षणिक विकास तसेच मराठवाड्याच्या सर्वांगीण प्रगतीसंदर्भात सकारात्मक




विचारविनिमय करून पदवीधरांच्या प्रश्नांची जाण असणारे आणि युवकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहणारे नेतृत्व विधान परिषदेत पाठविणे गरजेचे असल्याचे मत अनुप कुसुमकर यांनी व्यक्त केले. पदवीधरांचे प्रश्न, युवकांचे भविष्य आणि मराठवाड्याचा विकास या मुद्द्यांना प्राधान्य देत सर्व पदवीधर मतदारांनी सुशील घोटे पाटील यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे आणि त्यांना जास्तीत जास्त मतांनी विजयी करावे, असे आवाहन शिक्षक संघटनेकडून करण्यात आले आहे.

# मानूर येथे गुरुगिरी शिवाचार्य मानूरकर महाराजांचा पुण्यस्मरण सोहळा भक्तिमय वातावरणात

## समाधीस्थळी रुद्राभिषेक, महाआरती आणि महाप्रसाद; गुरुपरंपरेप्रती भाविकांची श्रद्धा

मानूर ।प्रतिनिधी

शिरूरकासार, तालुक्यातील मानूर येथील श्री तीर्थक्षेत्र नागनाथ देवस्थान जहागिरदार मठ संस्थानमध्ये लिंगैक्य श्री ष. ब्र. १०८ गुरुगिरी शिवाचार्य मानूरकर महाराज यांचा पंधरावा पुण्यस्मरण सोहळा शनिवारी (ता. १०) धार्मिक विधी आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. मानूर येथील प्रसिद्ध जहागिरदार मठ संस्थानचे मठाधिपती गुरुवर्य विरूपाक्ष शिवाचार्य महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडला. यानिमित्त सद्गुरू नागनाथ महाराज आणि लिंगैक्य गुरुगिरी शिवाचार्य मानूरकर महाराज यांच्या समाधीस्थळी विधिवत रुद्राभिषेक करण्यात आला. भाविकांनी समाधीस्थळी दर्शन घेऊन महाराजांच्या स्मृतींना अभिवादन केले.शालिवाहन शके १९४८, पराभवनाम संवत्सरातील भाद्रपद अमावास्येच्या निमित्ताने आयोजित या पुण्यस्मरण सोहळ्याला मठ संस्थानचे शिष्य, सद्भक्त, पंचक्रोशीतील भाविक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पहाटेपासूनच मठ संस्थान परिसरात धार्मिक विधींची लगबग सुरू होती. वेदमंत्रांचा घोष, शिवनामाचा गजर आणि भक्तांच्या उपस्थितीमुळे परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते.सोहळ्यानिमित्त सकाळी सहा ते नऊ या वेळेत सद्गुरू नागनाथ महाराज यांच्या समाधीस्थळी रुद्राभिषेक करण्यात आला. त्यानंतर सकाळी नऊ ते दुपारी बारापर्यंत शिवाचार्य मानूरकर महाराज यांच्या समाधीस्थळी उपस्थित स्वामींच्या मंत्रघोषात रुद्राभिषेकाचा धार्मिक विधी पार पडला. विधिवत पूजा-अर्चा आणि मंत्रोच्चारांत भाविकांनी सहभाग घेतला. दुपारी बारा वाजता महाआरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थित शिष्य, भक्त आणि ग्रामस्थांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. करंजी (ता. आष्टी) येथील समस्त मुळे परिवार आणि शिष्यगण महाप्रसादाचे यजमान होते.

महाप्रसादानंतर कळंब येथील महिला भजनी मंडळ आणि वाणेवाडी (ता. तेर) येथील भजनी मंडळाच्या वतीने सामूहिक भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. भक्तिगीतांच्या सादरीकरणातून गुरुभक्तीचा जागर करण्यात आला. भजन आणि नामस्मरणामुळे मठ संस्थान परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.लिंगैक्य गुरुवर्य गुरुगिरी शिवाचार्य मानूरकर महाराज यांच्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित या सोहळ्यातून गुरुपरंपरेप्रती असलेली श्रद्धा, भक्तिभाव आणि धार्मिक परंपरेचे दर्शन घडले. समाधीस्थळी दर्शन घेण्यासाठी दिवसभर भाविकांची ये-जा सुरू होती. मठ संस्थानच्या वतीने सर्व शिष्य आणि सद्भक्तांना उपस्थित



# अंबाजोगाईत श्री योगेश्वरी देवीच्या दसरा महोत्सवाला प्रारंभ

; अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे-सोनवणे यांच्या हस्ते शासकीय महापूजा संपन्न

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई येथील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आणि आराध्य दैवत असलेल्या श्री योगेश्वरी देवीच्या दसरा महोत्सवाला आज, रविवार, दिनांक ११ ऑक्टोबर रोजी घटस्थापनेने भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. अश्विन शुद्ध प्रतिपदा ते अश्विन शुद्ध दशमी, शके १९४८, म्हणजेच ११ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत हा महोत्सव साजरा करण्यात होत आहे.

दसरा महोत्सवाच्या पहिल्या दिवशी श्री योगेश्वरी मातेची विधिवत शासकीय महापूजा अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे-सोनवणे आणि त्यांचे यजमान हरिश्चंद्र सोनवणे यांच्या हस्ते संपन्न झाली. पारंपरिक धार्मिक विधींनुसार देवीची पूजा-अर्चा करण्यात आली. घटस्थापना आणि शासकीय महापूजेने




महोत्सवातील धार्मिक कार्यक्रमांना सुरुवात झाली.या प्रसंगी देवस्थान कमिटीचे सदस्य, पुरोहित मंडळी, पत्रकार बांधव आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. देवीच्या दर्शनासाठी भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. घटस्थापनेनिमित्त मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, दसरा महोत्सवाच्या निमित्ताने भाविकांमध्ये आनंद आणि उत्साह संचारला आहे.श्री योगेश्वरी देवीचा दसरा महोत्सव २० ऑक्टोबरपर्यंत चालणार असून, या कालावधीत देवीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी उपस्थिती अपेक्षित आहे. अंबाजोगाईच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेत महत्त्वाचे स्थान असलेल्या या महोत्सवाला घटस्थापनेने मंगलमय सुरुवात झाली आहे. २० ऑक्टोबर रोजी अंबाजोगाई शहरातील नियोजित मार्गावरून देवीची पालखी नगर प्रदक्षणेसाठी (सिमोलंगणासाठी) दुपारी ०१.०० निघेल रात्री नगरप्रदर्शनेनंतर सर्व मानकऱ्यांना श्रीफळ देऊन कार्यक्रमाची सांगता होईल.

# राजकारण बाजूला ठेवून दुष्काळ निवारणासाठी सर्वांनी एकत्र यावे-माजी आ.भीमराव धोंडे यांचे आवाहन

प्रामाणिकपणा व चिकाटीने व्यवसाय करण्याचा जयदत्त धस यांचा सल्ला

शिफोरा (फार्मा) मेडिकलचा भव्य उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी शहरातील शनी चौक परिसरात, मिलन इलेक्ट्रॉनिक्सच्या शेजारी सुरू करण्यात आलेल्या शिफोरा (फार्मा) मेडिकलचा भव्य उद्घाटन सोहळा रविवार, दि. ११ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या उद्घाटन सोहळ्याला राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांसह व्यापारी, नागरिक आणि हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. यावेळी माजी आमदार भीमराव धोंडे, जयदत्त धस तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते फीत कापून शिफोरा (फार्मा) मेडिकलचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सन्मान करण्यात आला.

उद्घाटनप्रसंगी मनोगत व्यक्त करताना माजी आमदार भीमराव धोंडे म्हणाले की, कोणताही व्यवसाय करताना जिद्द, प्रामाणिकपणा आणि चिकाटी असणे आवश्यक आहे. ग्राहकांना उत्तम दर्जाची औषधे उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांच्या आरोग्याची आणि विश्वासाची काळजी घेणेही महत्त्वाचे आहे. व्यवसायात गुणवत्ता आणि विश्वासार्हता टिकवून ठेवल्यास ग्राहकांचा विश्वास संपादन करता येतो. तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीविषयी चिंता व्यक्त करताना धोंडे म्हणाले की, सध्या तालुक्यात दुष्काळाचे संकट गंभीर असून, या परिस्थितीत सर्वांनी एकत्र येऊन दुष्काळ निवारणासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. यासाठी तालुक्यातील सर्व राजकीय नेत्यांनी आपापले राजकीय मतभेद बाजूला ठेवून एकत्रितपणे काम केले पाहिजे. सध्या तालुक्यात सुरू असलेल्या वादविवादांच्या तसेच आरोप-प्रत्यारोपांच्या घटनांना बाजूला ठेवून जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य दिले पाहिजे. राजकारणापेक्षा जनहित महत्त्वाचे असून, दुष्काळग्रस्त नागरिकांना दिलासा देण्यासाठी सर्वांनी एकजुटीने पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी जयदत्त धस यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, कोणताही व्यवसाय प्रामाणिकपणे आणि चिकाटीने केला पाहिजे. व्यवसायात सातत्य राखतानाच ग्राहकांना चांगल्या दर्जाच्या वस्तू व सेवा उपलब्ध करून देण्यावर भर दिला पाहिजे. शिफोरा (फार्मा) मेडिकलच्या माध्यमातून ग्राहकांना दर्जेदार औषधे मिळावीत आणि या व्यवसायाची उत्तरोत्तर प्रगती व्हावी, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

या प्रसंगी सतीश शिंदे, डॉ. शिवाजी राऊत, विजय गोल्हार आणि डॉ. मधुकर हंबर्डे यांनी मनोगत व्यक्त करून शिफोरा (फार्मा) मेडिकलच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमापूर्वी आमदार सुरेश धस आणि ड. हनुमंतराव थोरवे यांनीही मेडिकलला भेट देऊन सदिच्छा व्यक्त केल्या.

या उद्घाटन सोहळ्यास आष्टीचे नगराध्यक्ष जिया बेग, बीड जिल्हा परिषद सदस्य सतीश शिंदे, सईद चाऊस, किशोर हंबर्डे, संजय ढोबळे, ड. सय्यद ताहेर, शैलेश सहस्त्रबुद्धे, नियामत बेग, विजय गोल्हार, रमजान तांबोळी, डॉ. शिवाजी राऊत, संजय मेहेर, डॉ. मधुकर हंबर्डे, डॉ. गणेश पिसाळ, रंगनाथ धोंडे, श्रीधरपंत सहस्त्रबुद्धे, ड. रिजवान शेख, महेबूब जमादार, विठ्ठल बनसोडे, नामदेव राऊत, भारत मुरकुटे, उत्तम बोडखे, डॉ. नदीम शेख, शेख शरीफ, आत्माराम फुंदे, संतोष चव्हाण, इर्शान खान, मुफ्ती शफिक साहेब, अज्जुभाई



ताशकंद, अरुण सायकड, अमोल भंडारी, प्रविण कदम, शेख युनुस (शेठ), सय्यद शफी (माजी सरपंच), मा. टाटा बेग, सुरेश वारंगुळे, बब्बू आतार, अविनाश कदम, राजेंद्र लाड, सादिक कुरेशी, बाळू घोडके आणि शम्मू नगरसेवक यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. याशिवाय वैद्यकीय क्षेत्रातील अनेक डॉक्टरांनी या सोहळ्याला उपस्थिती लावली.

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला नागरिक, व्यापारी, हितचिंतक, सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार बांधवांनी मोठा प्रतिसाद दिला. या उद्घाटन सोहळ्याचे निमंत्रक अमान तय्यब सय्यद, मुद्दसर तय्यब सय्यद आणि नवाज जाकेर शेख तसेच आदर्श मुख्याध्यापक सय्यद तय्यब सर यांनी उपस्थित मान्यवरांचे यथोचित स्वागत व सन्मान केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध कवी प्रा. सय्यद अल्लाउद्दीन यांनी केले, तर मुख्याध्यापक सय्यद तय्यब सर यांनी उपस्थितांचे आभार मानले. मान्यवरांच्या उपस्थितीत आणि उत्साहपूर्ण वातावरणात शिफोरा (फार्मा) मेडिकलचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

# आ.सुरेश धस व त्यांच्या कुटुंबीयांबाबत सोशल मीडियावरील आरोपांप्रकरणी कारवाईची मागणी

## समस्त आंबेडकरी संघटनांचे आष्टी पोलिसांना निवेदन ;कारवाई न झाल्यास रास्ता रोको आंदोलनाचा इशारा

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस आणि त्यांच्या पत्नी प्राजक्ताताई धस यांच्याबाबत सोशल मीडियाच्या माध्यमातून कथित आक्षेपार्ह भाषा वापरून बिनबुडाचे आरोप केले जात असल्याचा आरोप करत, संबंधितांवर तातडीने कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी समस्त आंबेडकरी संघटना, आष्टी तालुका यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात आष्टी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पांढरे यांना निवेदन देण्यात आले असून, कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनासह रास्ता रोको करण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, आमदार सुरेश आण्णा धस आणि त्यांच्या पत्नी प्राजक्ताताई धस यांच्याविरोधात काही स्वयंघोषित समाजसेवकांकडून सोशल मीडियावर वारंवार आक्षेपार्ह भाषेत आरोप केले जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. हे आरोप राजकीय हेतूने प्रेरित असून, त्यातून लोकप्रतिनिधी व त्यांच्या कुटुंबीयांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

आमदार सुरेश धस हे आष्टी मतदारसंघातील कार्यक्षम आणि




विकासाभिमुख लोकप्रतिनिधी असून, सर्व जाती-धर्मांतील सर्वसामान्य जनतेशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्यामुळे त्यांची ओळख महाराष्ट्रभर निर्माण झाली आहे. मात्र, काही व्यक्तींकडून सोशल मीडियाचा वापर करून त्यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयांना लक्ष्य केले जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.अशा प्रकारच्या आरोपांमुळे मतदारसंघातील वातावरण दूषित होण्याची तसेच सामाजिक सलोखा आणि शांतता बिघडण्याची शक्यता असल्याची चिंता आंबेडकरी संघटनांनी व्यक्त केली आहे. सोशल मीडियावरून कोणत्याही व्यक्तीची बदनामी करणे, आक्षेपार्ह भाषा वापरणे किंवा समाजात गैरसमज निर्माण होईल असे वर्तन करणे, याबाबत पोलिसांनी गांभीर्याने दखल घ्यावी. संबंधित प्रकरणाची योग्य चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

सोशल मीडियावरील कथित बदनामीकारक आरोपांना वेळीच आळा घालून सामाजिक स्वास्थ्य अबाधित ठेवावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. संबंधितांवर तातडीने कारवाई न झाल्यास समस्त आंबेडकरी संघटनांच्या वतीने आष्टी येथे तीव्र स्वरूपाचे आंदोलन करून रास्ता रोको करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.या निवेदनावर नगरसेवक अरुण भैय्या निकाळजे, दीपक दादा निकाळजे, शशिकांत निकाळजे, परिवंत गायकवाड, राजू निकाळजे, जालिंदर निकाळजे, सादिक कुरेशी यांच्यासह आंबेडकरी समाजातील

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचा विराट आक्रोश मोर्चा सरकारला धडा शिकवणार

जालना शेख फारुक :- प मराठवाड्यात भीषण दुष्काळाने शेतकरी,शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांचे जगणे असह्य झाले असताना सरकार मात्र घोषणांपलीकडे ठोस मदत देण्यास अपयशी ठरत असल्याचा आरोप करत आता शेतकऱ्यांचा विराट आक्रोश सरकारला धडा शिकवेल असा घणाघाती इशारा खासदार डॉ.कल्याण काळे यांनी दिला.महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली बुधवार दि.१४ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाड्यातील शेतकऱ्यांचा विराट आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे.हा मोर्चा विभागीय आयुक्त कार्यालयावर धडकणार असून दुष्काळग्रस्तांच्या प्रश्नांवर सरकारला जाब विचारणार आहे.जालना जिल्हा काँग्रेस कमिटीच्या ग्रामीण व शहरातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या मोर्चा नियोजन बैठकीत खासदार डॉ.कल्याण काळे बोलत होते. यावेळी त्यांनी राज्य सरकारच्या दुष्काळ निवारणाच्या भूमिकेवर जोरदार टीका केली.चारा नाही पाणी नाही शेतकरी मात्र मदतीच्या प्रतीक्षेत मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असून ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. जनावरांसाठी चारा नाही पिण्यासाठी पुरेसे पाणी नाही तर दुसरीकडे रोजगाराची साधनेही ठप्प झाली आहेत. सणासुदीच्या काळातही कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला असून शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणावरही संकट ओढवले आहे.अशा बिकट परिस्थितीत शेतकरी आणि शेतमजूर हतबल झाले असताना शासनाकडून अपेक्षित मदत मिळत नसल्याचा आरोप खासदार डॉ.कल्याण काळे यांनी केला.मागील वर्षीच्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनाही अद्याप मदतीची प्रतीक्षा करावी लागत असल्याचे त्यांनी नमूद केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारकडून घोषणा केल्या जातात मात्र प्रत्यक्ष मदतीच्या बाबतीत ठोस कृती दिसत नसल्याची टीका त्यांनी केली.

हेक्टरी एक लाख रुपये द्या अन्यथा शेतकऱ्यांचा उद्रेक अटळ मराठवाड्यातील सध्याची दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता शेतकऱ्यांना प्रति हेक्टर किमान एक लाख रुपयांची विनाअट आर्थिक मदत देण्यात यावी ही मोर्चाची प्रमुख मागणी आहे. दुष्काळामुळे उद्धुस्त झालेल्या शेतीला आधार देणे शेतकरी कुटुंबांना आर्थिक संकटातून बाहेर काढणे आणि ग्रामीण भागातील जनजीवन पूर्वपदावर आणण्यासाठी सरकारने तातडीने ठोस निर्णय घ्यावेत अशी मागणी यावेळी करण्यात आली.

शेतकऱ्यांना संकटाच्या काळात वाऱ्यावर सोडून चालणार नाही.त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या सरकारला जनतेच्या ताकदीची जाणीव करून देण्यासाठी हा मोर्चा महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे खासदार डॉ.कल्याण काळे यांनी स्पष्ट केले.



# रय्यान फंक्शन हॉलचे उत्साहात उद्घाटन संपन्न

## रय्यान फंक्शन हॉल मुळे शहराच्या सौंदर्यात आणि वैभवात भर पडली- मुफ्ती मोईनोद्दीन साहेब

गेवराई (प्रतिनिधी)

शहरातील तय्यब नगर येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या रय्यान फंक्शन हॉलचा उद्घाटन सोहळा शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी मुफ्ती मोईनोद्दीन साहेब यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाला.यावेळी आमदार विजयसिंह पंडित, माजी जिल्हा परिषद सभापती युद्धजित पंडित, भाजपाचे युवा नेते शिवराज पवार, एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शफीक भाऊ, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर यांच्यासह या सोहळ्याला राजकीय,उद्योजक,पत्रकार,डॉक्टर,वकील व सामाजिक,क्षेत्रातील मान्यवरांसह अनेक नागरिकांची उपस्थिती होती.

रय्यान फंक्शन हॉलमुळे गेवराई शहराच्या सौंदर्यात आणि वैभवात भर पडली आहे. अनेक आई-वडिलांचे आपल्या मुला-मुलींचे विवाह चांगल्या आणि प्रशस्त ठिकाणी व्हावेत, असे स्वप्न असते. मात्र, आर्थिक परिस्थितीमुळे मोठ्या शहरांमध्ये विवाह सोहळे आयोजित करणे प्रत्येकाला शक्य होत नाही. अशा कुटुंबांसाठी गेवराईतच सुसज्ज शादीखाना उपलब्ध झाल्याने त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यास मदत होईल. रय्यान फंक्शन हॉलमुळे शहराची रौनक निश्चितच वाढली आहे, असे मत मुफ्ती मोईनोद्दीन साहेब यांनी यावेळी व्यक्त केले.

उद्घाटन सोहळ्यापूर्वी उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ व शाल देऊन स्वागत आणि सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी रय्यान फंक्शन हॉलचे व्यवस्थापक हाजी शेख बद्रोद्दीन साहेब, शेख जियाउद्दीन, शेख रईसोद्दीन आणि शेख रफियोद्दीन यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.गेवराई शहरात विवाह सोहळे आणि विविध सामाजिक कार्यक्रमांसाठी एक चांगली सुविधा उपलब्ध झाल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

पलसिद्ध महास्वामी पीठाच्या सेवाधारी शिवैक्य सौ. शोभा (हेमाताई) विभुते यांना

# परळीत वीरशैव लिंगायत समाजाची भावपूर्ण श्रद्धांजली

परळी वैजनाथ/ प्रतिनिधी

श्रीमज्जगद्गुरू पलसिद्ध महास्वामी पीठाचे मठाधिपती तथा सद्गुरू ष.ब्र. १०८ श्री सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज यांच्या भगिनी, पीठाच्या सेवाधारी आणि सर्वांच्या लाडक्या माय माऊली शिवैक्य सौ. शोभा (हेमाताई) शिवलिंग विभुते (पारडकर) यांचे अल्पशा आजाराने अचानक निधन झाले. त्यांच्या शिवैक्यामुळे वीरशैव लिंगायत समाजासह भक्त परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या निधनाबद्दल परळी वैजनाथ येथे वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

सद्गुरू सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज यांच्या धर्मसंवर्धन, धार्मिक कार्य आणि समाजसेवेच्या प्रदीर्घ प्रवासामागे शोभाताईंचा त्याग, पाठिंबा आणि योगदान अत्यंत मोलाचे होते. सद्गुरूंच्या कार्याला बळ देताना त्यांनी केलेला त्याग आणि दिलेली साथ अनमोल होती. त्या केवळ सद्गुरूंच्या भगिनी नव्हत्या, तर त्यांच्यासाठी आईच्या मायेने आधार देणाऱ्या, प्रत्येक सुख-दुःखात खंबीरपणे पाठीशी उभ्या राहणाऱ्या माय माऊली होत्या.

सद्गुरूंच्या धार्मिक आणि सामाजिक कार्याच्या वाटचालीत शोभाताईंनी दिलेल्या योगदानाचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्या प्रेमळ स्वभावाने, त्यागी वृत्तीने आणि सेवाभावाने त्यांनी सर्वांच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले होते. त्यामुळे त्यांचे जाणे ही केवळ एका कुटुंबाची हानी नसून, संपूर्ण वीरशैव लिंगायत समाजासाठी दुःखद घटना आहे.

परळी वैजनाथ येथे वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने त्यांना श्रद्धांजली अर्पण करताना त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. त्यांच्या त्यागाची, मायेची आणि सेवाभावी जीवनाची स्मृती सदैव समाजाच्या मनात जिवंत राहील, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

माय माऊली शोभाताईंचे शिवैक्य म्हणजे प्रेम, त्याग आणि मायेचा एक अध्याय संपला; मात्र सद्गुरूंच्या धर्मसंवर्धन व समाजसेवेच्या कार्यामागील त्यांचे योगदान सदैव स्मरणात राहील. विभुते कुटुंबीयावर कोसळलेल्या दुःखात दैनिक समर्थ राजयोग परिवार सहभागी आहे.



## टिपर - पिकअपच्या भीषण धडकेत अंबाजोगाईतील दोन युवकांचा मृत्यू ; परिसरात हळहळ!

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यातील नेकनूरजवळ टिपर आणि पिकअप यांच्यात भीषण अपघात झाला आहे. या दुर्घटनेत अंबाजोगाई शहरातील बाराभाई गल्ली येथील शौकत भाई कुरैशी यांच्या दोन मुलांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे अंबाजोगाई शहरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नेकनूर येथे दुपारच्या सुमारास टिपर आणि पिकअप यांच्यात जोरदार धडक झाली. या भीषण अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. या अपघाताची भीषणता इतकी होती की, वाहनातील दोन गायी आणि तीन बैलांचाही मृत्यू झाला. त्यामुळे या दुर्घटनेत मोठी जीवितहानी झाली आहे.

दरम्यान, अंबाजोगाईतील शौकत भाई कुरैशी यांच्या दोन मुलांचा अपघाती मृत्यू झाल्याची बातमी समजताच परिसरात शोककळा पसरली आहे. अपघात नेमका कशामुळे झाला ?, याबाबतची सविस्तर माहिती अद्याप समोर आलेली नाही.

## अर्धापूरमध्ये दुर्गामाता दौडी प्रारंभ



अर्धापूर (प्रतिनिधी) : नवरात्रोत्सवात श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने अर्धापूर शहरात दि.११ रविवार रोजी श्रीदुर्गामाता दौडीचे आयोजन करण्यात आले होते. सशक्त, स्वाभिमानी, संस्कारी, धर्माभिमानी आणि निर्व्यसनी पिढी घडविण्यासोबतच तरुणांमध्ये राष्ट्रभक्ती आणि हिंदू संस्कृतीविषयी जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुळ उद्देश आहे.

घटस्थापना ते विजयादशमी या दिवसांत पहाटेच्या मंगलमय वातावरणात शहरातील तरुण एकत्र येऊन विविध भागांतील दुर्गामंदिरांना भेट देतात. भगवे ध्वज, वारकरी टोपी आणि भगवे पारंपरिक फेटे परिधान करून भारतमाता, दुर्गामाता तसेच थोर महापुरुषांचा जयघोष केला जातो. या दौडीच्या माध्यमातून तरुणांमध्ये शिस्त, संस्कार, व्यसनमुक्ती आणि धर्माभिमानाची भावना रुजविण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच जातीभेद आणि मतभेद बाजूला ठेवून समाजात एकता, बंधुभाव आणि राष्ट्रप्रेमाची भावना दृढ करण्याचा संदेश दिला जातो.

नवरात्रोत्सवातील या धार्मिक व सामाजिक उपक्रमात अर्धापूर शहरातील तरुणांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन दुर्गामाता दौड उत्साहात यशस्वी करावी, असे आवाहन श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

## वडवणी शहरात संभाव्य पाणीटंचाई रोखण्यासाठी नगरसेविका रंजना नागेश डिगे आक्रमक!

शहरातील विविध भागांत बोअर घेण्याची मागणी; पाणीटंचाई निवारणासाठी आराखडा तयार करण्याबाबत मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

वडवणी प्रतिनिधी :- दिनांक ०९/१०/२०२६ शनिवार रोजी नगरपंचायत कार्यालयात मासीक बैठक मध्ये वडवणी शहरात भविष्यात निर्माण होणारी संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करण्याची मागणी नगरसेविका तथा सभापती रंजना नागेश डिंगे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी नगरपंचायत वडवणीचे मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन शहरातील विविध भागांत बोअर घेण्यासह पाणीटंचाई निवारणासाठी ठोस आराखडा तयार करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, भविष्यात निर्माण होणाऱ्या पाणीटंचाईचा विचार करून उपलब्ध जलसाठ्याचे काटकसरीने नियोजन करणे, पाण्याचा प्रभावी वापर करणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने राबविणे आवश्यक आहे. ऐन उन्हाळ्यात नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागू नये, यासाठी आतापासूनच नियोजन करण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

शहरातील या भागांत बोअर घेण्याची मागणी

वडवणी शहरातील रामबाग शाळा परिसरात विद्यार्थ्यांना पाण्याची सोय उपलब्ध व्हावी, यासाठी बोअर घेऊन त्यानंतर इतर आवश्यक कामे करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय बंगला चौक, राममंदिर परिसर, प्रभाग क्रमांक १६ मधील शासकीय जागेत, जय भवानी नगर, गॅस गोडाऊन परिसर, चौंडेश्वरी नगर, भीम नगर तसेच शहरातील इतर आवश्यक ठिकाणी बोअर घेण्याची मागणी व जुने बोअर चालू करुन ताब्यात घेऊन पाण्याची सोय करावी अशी निवेदनातून करण्यात आली आहे.शहराची वाढती पाण्याची गरज लक्षात घेऊन संभाव्य पाणीटंचाईवर वेळीच उपाययोजना करणे गरजेचे आहे. नागरिकांना नियमित पाणीपुरवठा व्हावा आणि विद्यार्थ्यांनाही पिण्याच्या पाण्याची सुविधा मिळावी, यासाठी नगरपंचायत प्रशासनाने तातडीने नियोजन करावे, अशी विनंती नगरसेविका रंजना नागेश डिगे यांनी केली आहे.

आता नगरपंचायत प्रशासन काय निर्णय घेणार ?

वडवणी शहरातील नागरिकांना भविष्यात पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी निवेदनातील मागण्यांवर नगरपंचायत प्रशासन कोणती कार्यवाही करते, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

## गंगामाऊली शुगर अँड अलाइड इंडस्ट्रीजच्या गळीत हंगामाचा शुभारंभ व सी.बी.जी. प्रकल्पाचे आज भूमिपूजन

केज/प्रतिनिधी

गंगामाऊली शुगर अँड अलाइड इंडस्ट्रीज प्रा. लि.उमरी साखर कारखान्याच्या पाच व्या गळीत हंगामाचा शुभारंभ आणि सी.बी.जी.(कॉम्प्रेस्ड बायोगॅस) प्रकल्पाचे आज रविवार रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आले आहे.कार्यक्रमास सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.या कार्यक्रमास मा.खा काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या मा.रजनीताई पाटील, गंगा उद्योग समूहाचे चेअरमन लक्ष्मणराव जी मोरे,राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय वारकरी शिक्षण मंडळाचे ह.भ.प.श्री. प्रकाश महाराज बोधले,ह.भ.प.श्री. उद्धव बापू आपेगावकर महाराज,महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस आदित्य दादा पाटील,काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे यांच्या सह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. बैलगाडी,वाहन व हार्वेस्टर पूजन,तर १०-४५ वाजता मोळी पूजन आणि मोळी टाकणे कार्यक्रम होणार आहे.यावेळी तिरुपती शिक्षण संस्थेचे सरचिटणीस बप्पासाहेब जाधव, मयूर बोडखे,भाजपचे सरचिटणीस किरण भैय्या पाटील, दादासाहेब जाधव पाटील,कारखान्याचे चेअरमन नवनाथराव थोटे,माजी चेअरमन आप्पासाहेब इखे,केज चे तहसीलदार अशोक भंडारे,युसुफवडगावचे सहायक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.गळीत हंगामाच्या शुभारंभा नंतर सी.बी.जी.प्रकल्पाचे भूमिपूजन होत असल्याने या कार्यक्रमाकडे परिसरातील शेतकरी, ऊस उत्पादक आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.गंगामाऊली शुगर अँड अलाइड इंडस्ट्रीज च्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## श्री बालाजी मंदिर देवस्थान हडकोच्या गंगाळ मधील वडाला भाविक भक्तांची मोठी मागणी

नवीन नांदेड - दरवर्षी वार्षिक ब्रम्होत्सव निमित्ताने गेल्या अनेक वर्षांपासून सुरु करण्यात आलेल्या तिरुपती बालाजी मंदिर येथील प्रसिद्ध असलेल्या वडा प्रसादाला श्री बालाजी मंदिर देवस्थान हडकोच्या वतीने करण्यात येत असलेल्या प्रसादाला भाविक भक्तांनी मोठ्या प्रमाणात मागणी केली आहे.

आंध्रप्रदेशातील तिरुपती बालाजी मंदिर येथील प्रसिद्ध असलेल्या वडा प्रसादाला मंदिरात दर्शनाला गेल्यानंतर भाविक मोठ्या प्रमाणात मागणी करतात त्याच बरोबर लाडू चीही भक्तांना आवड असल्याने त्याची मागणी मंदिर देवस्थाना कडे करण्यात आल्या नंतर गेल्या दोन वर्षांपासून हडको येथील बालाजी मंदिर देवस्थान येथे या प्रसादाला सुरुवात करण्यात आल्यानंतर मोठ्या प्रमाणात भक्त गणांनी मागणी करून गंगाळ हि करण्यात आले , वडा हा हिंग व कस्तुरी मेथी मिश्रण असलेला हा वडा प्रसाद म्हणून अनेक दिवस तो चांगला राहू शकतो व पचनास उपयुक्त असल्याने व चविष्ट दर्जाचे असल्यामुळे अनेकांनी मागणी केली ,या सोबतच लाडू ,खिचडी , चणा ,चित्रान्न ,साखर भात ,या गंगाळ मध्ये नवरात्र उत्सवात भक्तांची मोठ्या प्रमाणात मागणी असते ,प्रति नग वडा व बुंदीचा लाडू दहा रुपये असल्याने भाविक मोठया प्रमाणात गर्दी करीत आहेत .

भक्तांसाठी चोविसवा ब्रम्होत्सव दसरा निमित्य विविध दैनंदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे





आवाहन विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष अरुण दमकोंडवार,उपाध्यक्ष प्रकाशसिंह परदेशी, सचिव माणिक देशमुख कोषाध्यक्ष,चंद्रशेखर चव्हाण, सहसचिव बालकृष्ण येरगेवार, सदस्य करणसिंह ठाकूर, संतोष वर्मा,अजय भंडारी , विवेकानंद देशमुख ,सचिन नपाते, गोवर्धन बियाणी,सुभाषकारंजकर , किशोर देशमुख,सतिश मोरे यांनी केले आहे.

## कालेजी देवी मंदिरात नवरात्र महोत्सवाचे आयोजन विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची जेयत तयारी

मुदखेड (प्रतिनिधी)

येथील प्रसिद्ध कालेजी देवी मंदिर देवस्थानच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही नवरात्रोत्सव व दसरा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. हा उत्सव ११ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर या कालावधीत संपन्न होणार असून, सर्व भाविक भक्तांसाठी विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सावातील प्रमुख कार्यक्रमः घटस्थापना व महाप्रसाद (११ ऑक्टोबर, रविवार): सकाळी घटस्थापना व महाप्रसाद होईल. सायंकाळी ७ ते १० या वेळेत कालेजी देवी साहित्य व संस्कृती सेवा मंडळ, मुदखेड यांचा कार्यक्रम रंगेल. भजन व अभंगवाणीचे आयोजनः १२ ऑक्टोबरः शिवपार्वती भजनी मंडळ. १३ ऑक्टोबर शारदा नगर महिला भजनी मंडळ व सायंकाळी श्री कालीदास सु. चौधरी यांची अभंगवाणी.

१४ ऑक्टोबरः संत जनाबाई भजनी मंडळ व अपरंपार भजनी मंडळ मठगल्ली. १५ ऑक्टोबर एकनामी दत्तकृपा भजनी मंडळ. १६ ऑक्टोबर स्वर विलास संगीत विद्यालय नांदेड प्रस्तुत कृष्णा चौधरी यांची अभंगवाणी. १७ ऑक्टोबर स्वामी समर्थ महिला भजनी मंडळ बापुसाहेब नगर, सन्मित्र कॉलनी. १८ ऑक्टोबर कै. यशवंतराव डांगे संगीत विद्यालय मुदखेड प्रा. तानाजी मेटकर व विद्यार्थी. प्रसिद्ध कीर्तनकारांची कीर्तनसेवा सायंकाळी ५ ते ७.१५.

१२ ऑक्टोबरः ह.भ.प. सौ. वैशाली (क्षमा) वि. नांदेडकर., १४ ऑक्टोबरः ह.भ.प. विलास गुरु लिंबेकर महाराज. १५ ऑक्टोबरः ह.भ.प. अवधुत महाराज टाकळीकर. १६ ऑक्टोबरः ह.भ.प. शरद महाराज आंबेकर वसमत. १७ ऑक्टोबरः ह.भ.प. अमोल महाराज नळेगावकर. १८ ऑक्टोबरः ह.भ.प. विक्रम महाराज नांदेडकर.

धार्मिक विधी व गोंधळ

१९ ऑक्टोबर (नवमी): महानवमी होमहवन यजमान दुर्गाचारी चेना जोलु तसेच ब्रम्हानंद पाचंगे यांचा गोंधळ. सायंकाळी पुरोहित मारुती महाराज यांच्या हस्ते कुंकुम अर्चन. १८ ऑक्टोबरः रात्री ९ ते १२ गोंधळ व आरती आणि रात्री १२ वाजता पायस प्रसाद वितरण अनिल दत्तात्रय यटमवार. विजया दशमी दसरा २० ऑक्टोबर, मंगळवार): सायंकाळी ४ वाजता श्रींची पालखी मिरवणूक निघेल.

दैनंदिन वेळापत्रक व नियमः भक्ती फेरी (जोगवा): दररोज सकाळी ६ ते ७ वा. दुर्गा सप्तशती पाठः दररोज सकाळी ९ वा. मारुती गुरु सकाळची आरतीः सकाळी १०.३० ते १२.४५ दुपारची आरती व महाप्रसादः दुपारी १ वा. सायंकाळची आरतीः दररोज सायंकाळी ७:३० वा. रात्रीचा गोंधळः दररोज रात्री ९ ते १२ ब्रम्हानंद पाचंगे येळेगावकर श्री कालेजी देवी मंदिर देवस्थान विश्वस्त मंडळ व समस्त सेवेकरी भक्त मंडळ, मुदखेड यांच्या वतीने सर्व भाविक भक्तांना या नवरात्रोत्सवातील विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा आणि महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## सिडको-हडको सह परिसरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट

नांदेड जिल्हा प्रतिनिधी :- अनिल धमने पाटील सिडको हाड्को परिसरासह औद्योगिक वसाहत आणि उस्माननगर रोड परिसरातही मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात वावर झाला असल्याने सकाळी मॉर्निंग वॉक करणाऱ्या नागरिकां सह लहान मुलाबाळां सह महिला मंडळींना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे कारण या कुत्र्याची टोळी कधी कुणावर हमला करतील सांगता येत नसुन ते अचानक एखाद्याच्या अंगावर गेले तर सर्वच टोळी मागे धावत जात असुन या मुळे महिला व लहान बाळांत भितीचे वातावरण निर्माण झाले असुन कोनता अनुचित प्रकार घडणार नाही या पुर्वी मनपा प्रशासनाने लक्ष देऊन या कुत्र्यांच्या टोळीचा बंदोबस्त करून सर्व सामान्य जनतेला दिलासा द्यावा कारण मनपा प्रशासनाचे दुर्लक्ष या पुर्वी मनपा प्रशासनाची यंत्रणा कार्यरत होती मग आत्ता का नाही ?. अशी मागणी सिडको हाडको परिसरातील भयभित लहान विद्यार्थी पालक व महिला मंडळी यांसह जेष्ठ नागरीकांनी केली आहे.

शहरातील सिडको-हडको परिसरासह औद्योगिक वसाहत आणि सिडको परिसरालगत असलेल्या उस्माननगर रोड वर मोकाट कुत्र्यांचा हौदोस मोठ्या प्रमाणावर वावर वाढल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. रस्त्यांवर आणि वसाहती सह



गल्ली बोळा अंतर्गत मार्गांवर मोकाट कुत्र्यांचे कळप फिरताना दिसत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.सिडको-हडको परिसरात सकाळी कामानिमित्त घराबाहेर पडणारे नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मोकाट कुत्र्यांच्या वावरामुळे अडचणींचा सामना करावा लागत आहे.औद्योगिक वसाहतीमध्ये ये-जा करणारे कामगार आणि वाहनचालकांनाही या समस्येचा त्रास मोठया प्रमाणात सहन करावा लागत आहे. उस्माननगर रोड परिसरातही मोकाट कुत्र्यांचा वावर नागरिकांसाठी चिंतेचा विषय बनला आहे.मोकाट कुत्र्यांचा वाढता वावर लक्षात घेता भविष्यात एखादी गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधित मनपा प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन मोकाट कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत महानगरपालिका प्रशासनाने सिडको-हडको, औद्योगिक वसाहत आणि उस्माननगर रोड परिसरातील मोकाट कुत्र्यांच्या समस्येवर मनपा आयुक्तांनी व्यक्तीक लक्ष देऊन तातडीने तोडगा काढुन तात्काळ मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी सिडको हाडको परिसरातील जेष्ठ नागरीक लहान बालकांचे पालक व महिला मंडळीनी अपेक्षा व्यक्त केली आहे.



## आ.सुरेश धस व त्यांच्या कुटुंबीयांबाबत सोशल मीडियावरील आरोपांप्रकरणी कारवाईची मागणी

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस आणि त्यांच्या पत्नी प्राजक्ताताई धस यांच्याबाबत सोशल मीडियाच्या माध्यमातून कथित आक्षेपार्ह भाषा वापरून बिनबुडाचे आरोप केले जात असल्याचा आरोप करत, संबंधितांवर तातडीने कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी समस्त आंबेडकरी संघटना, आष्टी तालुका यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात आष्टी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पांढरे यांना निवेदन देण्यात आले असून, कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनासह रास्ता रोको करण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, आमदार सुरेश आण्णा धस आणि त्यांच्या पत्नी प्राजक्ताताई धस यांच्याविरोधात काही स्वयंघोषित समाजसेवकांकडून सोशल मीडियावर वारंवार आक्षेपार्ह भाषेत आरोप केले जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. हे आरोप राजकीय हेतूने प्रेरित असून, त्यातून लोकप्रतिनिधी व त्यांच्या कुटुंबीयांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

आमदार सुरेश धस हे आष्टी मतदारसंघातील कार्यक्षम आणि विकासाभिमुख लोकप्रतिनिधी असून, सर्व जाती-धर्मांतील सर्वसामान्य जनतेशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्यामुळे त्यांची ओळख महाराष्ट्रभर निर्माण झाली आहे. मात्र, काही व्यक्तींकडून सोशल मीडियाचा वापर करून त्यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयांना लक्ष्य केले जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

अशा प्रकारच्या आरोपांमुळे मतदारसंघातील वातावरण दूषित होण्याची तसेच सामाजिक सलोखा आणि शांतता बिघडण्याची शक्यता असल्याची चिंता आंबेडकरी संघटनांनी व्यक्त केली आहे. सोशल मीडियावरून कोणत्याही व्यक्तीची बदनामी करणे, आक्षेपार्ह भाषा वापरणे किंवा समाजात गैरसमज निर्माण होईल असे वर्तन करणे, याबाबत पोलिसांनी गांभीर्याने दखल घ्यावी. संबंधित प्रकरणाची योग्य चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

सोशल मीडियावरील कथित बदनामीकारक आरोपांना वेळीच आळा घालून सामाजिक स्वास्थ्य अबाधित ठेवावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.